सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ३० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अजित पवार म्हणजे महाराष्ट्राला कधीच न लाभलेले उत्तम मुख्यमंत्री

### अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्र्यांचं भावनिक भाषण
### अजित पवारांच्या आठवणी सांगताना देवेंद्र फडणवीस भावूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाली असून त्यांच्या जाण्याने पोकळी या शब्दाची व्याप्ती आता कळायला लागली आहे. त्यांची पोकळी भरून काढणं शक्य नाही आणि दादांसारखा नेता पुन्हा होणं अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसंच, अजित पवार हे उत्तम मुख्यमंत्री होते, जो महाराष्ट्राला कधीच मिळाला नाही, असंही देवेंद्र फडणवीसांनी आज म्हटलं. ते आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अजित पवारांच्या शोकप्रस्तावात म्हणाले.



**अजित पवार कठोर निर्णय घ्यायचे**

अधिवेशनाच्या काळात सर्वांत आधी अजित पवार विधानभवनात यायचे. नेहमीच खुर्चीत दादा दिसायचे. सभागृह कितीही काळ चाललं तर दादा आपल्याजागी बसलेले पाहायला मिळायचे. आज ते आपल्यात नाहीत ही निश्चितपणे खंत आहे. यावर्षी दादांनी बारावं अर्थसंकल्प मांडला असता. पुढच्या वर्षी १३ वा अर्थसंक्लप मांडून बॅरिस्टर शेषराव यांच्याबरोबर बरोबरी केली असती. कदाचित त्या नंतरच्या कालावधीत सर्वाधिक अर्थसंकल्प मांडणारे नेते म्हणून दादांकडे पाहिलं असतं. पण त्याआधीच दादा गेले. यावेळी अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी माझ्यावर आली. अर्थसंकल्पाच्या संदर्भात आपल्या सर्वांनाच कल्पना आहे की, कठोर निर्णय घ्यायचे असतील तर ते घ्यायला कधीही मागेपुढे पाहणारे अजित दादा होते. पण त्याचवेळी वित्तविभागाने लाडकी बहीण योजनेचा भार हा अर्थसंकल्पावर फार मोठ्या प्रमाणात पडेल, म्हणून याचा पुनर्विचार करावा असं सुचवल्यावरही अजित पवारांनी ठामपणे निर्णय घेऊन लाडकी बहीण योजना सुरू केली, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

लाडकी बहीण योजनेनंतर अजित पवारांनी गुलाबी जॅकेट घालायला सुरुवात केली होती. त्यामुळे आम्हालाही गुलाबी जॅकेट घालायला लावलं होतं. आता या गोष्टी फक्त आठवणीत आहेत. खरंतर अशाप्रकारचा प्रस्ताव मांडणं घटनात्मक जबाबदारी आहे. पण मला असं वाटतं की माझ्याकरता अत्यंत भावनिक प्रसंग आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**अजित पवारांची पोकळी कधीच भरून निघणार नाही**

यावेळी त्यांनी महाकवी भास यांच्या स्वप्नवासवदत्तम् या नाटकातील एक पंक्ती वाचून दाखवली. अजित पवारांचा असा मृत्यू होणं हे खरं म्हणजे राजकीय हानी नाही तर सर्वांच्याच अंत्यकरणाला प्रचंड वेदना देणारी बाब आहे. काही गोष्टींवर काळ हे औषध असतं. पण कितीही काळ गेला तरी काही वेदना कमी होत नाहीत. अशाप्रकारची ही वेदना असणार आहे. अनेकवेळा राजकीय नेत्यांच्या निधनानंतर पोकळी निर्माण झाली असं विधान करतो. ज्येष्ठ नेता निघून गेल्यानंतर त्यावेळी त्यांच्या निधनाने त्यांची कमतरता जाणवते. पण ज्यावेळी अजित दादांसारखा व्यक्ती निघून जातो, तेव्हा पोकळी निर्माण झाली या शब्दाची व्याप्ती लक्षात येते. कारण, अशाप्रकारचे अजित दादा होऊ शकत नाही. त्यामुळे ही पोकळी भरून काढणं कठीण आहे. त्यामुळे त्यांचं अकस्मात निधन एक धक्काच आहे, अशा भावना फडणवीसांनी व्यक्त केल्या.

कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती ही प्रेरणादायी काव्यपंक्तीही त्यांनी अजित दादांना स्मरून सभागृहात मांडली. प्रत्येक क्षणाचा नीट उपयोग करणारे अजित दादा, नियोजन करणारे अजित दादा असे नेते राजकारणात विरळ पाहायला मिळतात. आमचा दोघांचाही जन्म २२ जुलैचा. ते ११ वर्षे मोठे होते. खऱ्या अर्थाने ते माझे दादा होते. आमची एक दशकापेक्षा जास्त काळ अतिशय जवळीक होती. अतिशय चांगली मैत्री होती. १९९९ साली दादांची ओळख झाली. पण २०१४ नंतर भावनिक नातं दादांशी तयार झालं. राष्ट्रवादी काँग्रेस स्ट्रॅटेजिक पार्टनर आहे असं म्हणत असताना अजित दादांकडे भावनिक दृष्टीकोनातून पाहिलं, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## उपराजधानीत आणखी अर्धा टन गांजा पकडला

### नागपूरच्या मौदा टोल नाक्यावर टास्क फोर्सची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नागपूर**

राज्याचे मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहविभागाचा कारभारही आहे. त्यामुळे कायदा- व सुव्यवस्थेची सुत्रेही त्यांच्याच हाती आहेत. मात्र त्यांचेच शहर अंमली पदार्थ तस्करीचा गड बनत चालला आहे. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने मौदा येथे लावलेल्या सापळ्यात अर्धा टनांहून अधिक गांजा पोलिसांच्या हाती लागला.



पश्चिम बंगालमधील कोलकाता येथून ट्रकमध्ये प्लास्टिकच्या पोत्यात भरून हा गांजा रस्ता मार्गे मुंबईकडे निघाला होता.अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सला गेल्या चार दिवसांपासून गुप्त बातमीदारांमार्फत याचा सुगावा लागला होता. त्यानुसार पथक टोल नाक्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनावर नजर ठेवून होते. मौदा पोलीस हद्दीतून कोलकाताचा क्रमांक असलेल्या एका ट्रकवर पथकाला संशय आला.

पथकाने ट्रकची झडती घेतली असता त्यात काळ्या रंगाच्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरलेला ५०७ किलोग्रॅम गांजा हाती लागला. बाजारात या गांजाची अंदाजे किंमत जवळपास २ कोटी ५० लाख रुपये असण्याची शक्यता आहे.संजय यादव असे या गांजा तस्कराचे नाव असून तो बिहार राज्यातील गया येथील रहिवासी आहे. कोलकाता येथून ट्रकमध्ये भरलेला गांजा घेऊन संजय हा मुंबईकडे रस्ता मार्गाने जाणार होता.

वेगवेगळ्या तपास यंत्रणांनी गेल्या दोन महिन्यांत एकाच वेळी जवळजवळ अर्धा टन गांजाची तस्करी पकडली आहे. सर्वांत आधी केंद्रिय महसूल गुप्तचर यंत्रणेच्या पथकाने सावनेर नाक्यावर ५०० किलो गांजाची तस्करी पकडली होती. त्यानंतर गेल्याच महिन्यात टास्क फोर्सनेही ग्रामीण भागात अशीच कारवाई केली होती. आता पुन्हा एकदा तब्बल ५०७ किलोग्रॅम गांजाची तस्करी पथकाने रोखली. त्यामुळे अंमली पदार्थ तस्करीसाठी देशाचे मध्यवर्ती ठिकाण असलेले नागपूर गड बनत चालला आहे.

## अजितदादा गेले आणि बारामती पोरकी झाली - उद्धव ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरु झालं आहे. राज्यपालांच्या अभिभाषणानंतर शोकप्रस्ताव सादर करण्यात आला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ज्या सदस्यांचं निधन झालं आहे त्यांच्याबाबत दोन्ही सभागृहांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील प्रमुख नेत्यांनी भाष्य केलं. विधान परिषदेत उद्धव ठाकरे यांनी अजित पवार यांच्याविषयी भाष्य केलं.



**अजितदादा आणि आम्ही एकत्र येऊ असं वाटलं नव्हतं–ठाकरे**

अजित पवार आणि आम्ही कधी एकत्र येऊ असं वाटलंही नव्हतं. कारण दोन्ही पक्ष राजकीय दृष्ट्या एकमेकांच्या विरोधात होते. दोन सकाळ अशा आपण पाहिल्या आहेत ज्यातल्या एका सकाळच्या बातमीने अजित पवारांनी सगळ्यांना धक्का दिला होता. तर दुसऱ्या सकाळच्या बातमीने महाराष्ट्र हळहळला असं उद्धव ठाकरेंनी विधान परिषदेत म्हटलं आहे. आम्ही अनपेक्षितपणे एकत्र आलो. मनात एक अढी होती. मला प्रशासनाचा अनुभव नव्हता मी मुख्यमंत्री म्हणून इथे आलो होतो. मला एक धक्का दिला होता आणि उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार बसणार हे मला अनपेक्षित होतं. पण कामकाज सुरु झालं तेव्हा मला कळलं की अजितदादांसारखा उत्तम, दिलदार सहकारी किंवा मित्र मी गमावला आहे. शासकीय किंवा प्रशासकीय कामकाजात अजितदादांचा मला आधार होता. मला एखादी गोष्ट कळली नाही तर मी अजितदादांशी बोलायचो. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करण्याचा त्यांचा स्वभाव होता. सहावेळा अजितदादा राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. पण एक गोष्ट महत्त्वाची वाटते की एका मोठ्या वृक्षाच्या सावलीतून बाहेर पडून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. काही जणांना वृक्षाच्या सावलीत आयुष्यभर रहावं लागतं. पण काहीजण असे असतात जे स्वतःची ओळख निर्माण करतात त्यातले अजितदादा होते.

मी दोन ते तीन वेळा बारामतीत गेलो होतो. त्यावेळी माझ्या प्रकृतीची तक्रार होती. अजितदादा तेव्हा माझ्याबरोबर ठरवून आले होते. बारामतीचा कायापालट त्यांनी मला दाखवला होता. ते सगळं पाहणं हे अचंबित करणारं होतं. रस्ते, मोठ्या संस्था, विद्यालयं सगळं मला त्यांनी दाखवलं. त्याच बारामतीत दुर्घटना घडली, अजित पवार गेले आणि बारामती पोरकी झाली असं मला जाणवून गेलं. आनंदाने भरलेली बारामती मला पोरकी झाल्याचं जाणवलं. लॉकडाऊन मध्ये मंत्रालय बंद होतं, अर्थचक्र थांबतं की काय असं वाटत असतानाच महाराष्ट्राचं अर्थचक्र सुरु ठेवलं आणि कुठलीही योजना बंद पडू दिली नाही असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. प्रशासन चालवण्यासाठी जे कसब लागतं ते अजिदादांनी दाखवलं असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित

### ५०% आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणी निवडणुका नाहीत; सुप्रीम कोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ नवी दिल्ली**

राज्यातील उरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्ट ऑफ इंडियाने अत्यंत महत्त्वाचा निर्णय देत ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणी निवडणुका घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. त्यामुळे संबंधित महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.राज्य सरकारने निवडणुका घेण्यास परवानगी देण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयात केली होती. मात्र, आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे जाऊ शकत नाही, या घटनात्मक तत्त्वाचा पुनरुच्चार करत न्यायालयाने ही मागणी फेटाळली. त्यामुळे सध्याची मनाई कायम ठेवण्यात आली आहे.न्यायालयाने स्पष्ट केले की, आरक्षण रचनेबाबत अंतिम निर्णय लवकरच दिला जाईल. तोपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने संबंधित ठिकाणी निवडणूक प्रक्रिया सुरू करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील सत्तास्थापनेवर परिणाम होणार असून राजकीय व प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. अंतिम निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## अजितदादांच्या अपघाताचा थातूरमातूर तपास केल्यास मराठी माणूस दाखवून देऊ

### रोहित पवारांचा केंद्र सरकारला थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

२८ जानेवारी रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामतीकडे जात असताना त्यांचे विमान धावपट्टीवर उतरताना कोसळले होते. त्यानंतर झालेल्या स्फोटात अजित पवार यांच्यासह विमानातील पाच जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अलीकडेच घातपाताचा संशय व्यक्त केला होता. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी विमानात गरजेपेक्षा जास्त इंधन असल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच वैमानिक सुमित कपूर यांनी विमान मुद्दाम जमिनीवर आदळले असावे, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली होती. आता अजित पवार यांच्या अपघात प्रकरणावरून रोहित पवार आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. थातूरमातूर तपास केल्यास मराठी माणूस दाखवून देऊ, असा इशारा रोहित पवार यांनी केंद्र सरकारला दिला आहे. गेल्या महिन्याभरात काय तपास केला ते सांगा. सीबीआयकडे आधीच तपासासाठी खूप प्रकरणे आहेत, असे देखील त्यांनी म्हटले आहे.



रोहित पवार म्हणाले की, अमोल मिटकरी, रुपाली ठोंबरे असतील, लहान-सहान कार्यकर्ते असतील, सगळे सातत्याने बोलत आहेत. पायलट संदर्भात बोलत असताना आम्ही पण डिटेल बोललो आहोत. माझी पण इच्छा आहे की, पारदर्शक तपास व्हावा. सीबीआय तपास दिला गेलाय. गेल्या महिन्याभरात त्यांनी काय तपास केलाय, सीसीटीव्ही कॅमेरे ताब्यात घेतले का? क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन करायला पाहिजे ते केले का? सखोल चौकशी करणं महत्त्वाचे आहे. दोन थातूरमातूर रिपोर्ट दिले गेले. सत्तेतील लोकांचे आणि व्हीएसआरचे कसे संबंध होते? मंत्र्यांचे संबंध व्हीएसआरसोबत कसे होते याचे पुरावे आमच्याकडे आहेत. सीबीआय तपास होत असेल तर चांगली गोष्ट आहे. पण आतापर्यंत ७ हजार ७५ केसेसचे निकाल दिले गेले नाहीत. बर्फात आणि फ्रिजमध्ये केसेस टाकायच्या असा हा प्रकार आहे. सीबीआयला केस देताना कालमर्यादा देण्याची गरज आहे, असे त्यांनी म्हणालेत.रोहित पवार पुढे म्हणाले की, ब्लॅक बॉक्स किती जळला याचा देखील पुरावा आमच्याकडे आहे. श्वेता सिंह कशा भ्रष्टाचार करत आल्या आहेत, त्यासंदर्भात देखील तपास व्हायला पाहिजे. थातूरमातूर तपास केल्यास मराठी माणूस दाखवून देऊ. गेल्या महिन्याभरात काय तपास केला ते सांगा. सीबीआयकडे आधीच तपासासाठी खूप प्रकरणे आहेत, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

**...तर शरद पवार राज्यसभेवर जातील; रोहित पवारांचे मोठे संकेत,**

राज्यसभा निवडणुकीच्या चर्चेवर बोलताना रोहित पवार म्हणाले की, शरद पवार साहेबांना ६० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. जेव्हा अनुभवाची चर्चा होईल तसेच जर त्यांची इच्छा असेल, तर ते नक्कीच राज्यसभेवर जातील. चर्चेच्या वेळी आम्ही साहेबांच्या नावाचा प्रस्ताव नक्कीच ठेवू.

## विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांत दिवंगत अजित पवारांचा शोकप्रस्ताव; सर्वच नेते बोलताना भावूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

**अजित पवार नशिबाने नव्हे तर कर्तृत्वाने मोठे झाले – मुनगंटीवार**

अजित पवार नशिबाने नव्हे तर आपल्या कर्तृत्वाने मोठे झाले. ते आपल्यात नाहीत यावर कुणाचाही विश्वास बसत नाही. आज राजकारणात जे पोटात ते ओठात या पठडीतले फार कमी नेते आहेत. अजित पवार त्यापैकी एक नेते होते, अशी भावना भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत बोलताना व्यक्त केली.



मला फाईल नको निकाल दाखवा असे म्हणणारे अजित दादा होते. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या विकासाची हानी झाली, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.

**मी व दादांनी लहानपणीच वडील गमावले – वडेट्टीवार**

अजित पवार आणि माझे वडील आम्ही लहान वयात गमावले. कमी वयात वडिलांचे छत्र हरपल्यावर माणूस जबाबदार होतो. अजित दादा यांच्या स्वभावातील कठोरपणा हा त्यातून आला होता. विरोधक हे विरोध करणार, पण तो विरोध वैयक्तिक नव्हता हे अजितदादा यांना माहिती होत, त्यामुळे त्यांनी विरोधकांना कधी वाईट वागणूक दिली नाही, असे मत विजय वडेट्टीवार यांनी यावेळी व्यक्त केली.

**विमान दुर्घटनेला शरद पवारांनी अपघात का म्हटले? – भास्कर जाधव**

अजित पवार यांचा विमान अपघात झाला, हे मानायला महाराष्ट्रातील एकाही सर्वसामान्य माणसाचे मन तयार नाही. तो अपघात नसून घातपातच आहे, असा दाट संशय प्रत्येकाच्या मनात आहे. बारामतीमध्ये त्या दिवशी लोकांच्या मनात जी चीड होती, तिचे रूपांतर वणव्यात होऊ नये आणि महाराष्ट्र होरपळू नये, यासाठीच शरद पवारांनी तो 'अपघात' असल्याचे विधान केले होते, असा खुलासा ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी आज विधानसभेच्या सभागृहात केला. अजितदादांचा घात झाला की अपघात, हे मुख्यमंत्र्यांनी शोधून काढावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

**अजितदादा अचानक डाव मोडून गेला – छगन भुजबळ**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी अजित पवारांच्या निधनामुळे आमचा आधारवड कोसळल्याची भावना व्यक्त केली. अजित पवारांच्या शोक प्रस्तावाला पाठिबा देण्याची वेळ येईल असे मला स्वप्नातही वाटले नव्हते. ते इथेच कुठे तरी आहेत असे वाटते. पण आज ते नाहीत हे वस्तुस्थिती आहे. त्यांच्या रुपाने आम्हा सर्वांचा आधारवड उन्मळून पडला आहे, असे ते म्हणाले.

## बाथरूमच्या फलकावर छत्रपती शिवाजी महाराज महाराणी पद्मिनी यांचा फोटो; देशभरात संतापाची लाट

### हरियाणाच्या सिकरी येथील रिसॉर्टमधील संतापजनक प्रकार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

हरियाणातील सिकरी येथील एका रिसॉर्टमधील वॉशरूमच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो लावण्यात आल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला. त्यावर शिवप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त झाल्यानंतर रिसॉर्ट मालकाने शिवरायांचा फोटो काढून या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, हरियाणाच्या सिकरी येथील मथुरा रोडवर मिलन रिसॉर्ट नामक हॉटेल आहे. या हॉटेलच्या एका बँक्वेट हॉलमधील पुरुषांच्या वॉशरूमच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो लावण्यात आला होता. तर महिलांच्या वॉशरूमच्या दरवाजावर राणी पद्मिनी (पद्मावती) फोटो लावण्यात आला होता. या ठिकाणी आलेल्या व्यक्तीने या घटनेचा एक व्हिडिओ तयार केला. त्यानंतर तो सोशल मीडियावर अपलोड केला. त्यानंतर काही वेळातच हा व्हिडिओ व्हायरल झाला. त्यावर शिवप्रेमींनी तीव्र संताप व्यक्त करत रिसॉर्ट चालकांना हे फोटो तत्काळ काढून टाकण्याचा इशारा दिला.

## संपादकीय ......

# श्रीलंकेत खासदारांच्या पेन्शनवर लगाम

*आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या राष्ट्रांमध्ये अनेकदा काटकसरीची भाषा ऐकू येते; परंतु ती भाषा प्रथम स्वतःवर लागू करण्याचे धाडस क्वचितच दाखवले जाते. श्रीलंकेने खासदारांची पेन्शन रद्द करण्याचा निर्णय घेत असे दुर्मीळ उदाहरण समोर ठेवले आहे. जनतेला संयम, त्याग आणि करांच्या भाराचे ओझे पेलण्याचे आवाहन करताना सत्ताधार्यांनी स्वतःच्या विशेषाधिकारांवर गदा आणण्याची तयारी दाखवली. यातून एक वास्तव समोर येते. ते म्हणजे, राजकारणी आणि सामान्य नागरिक यांच्या सामाजिक सुरक्षिततेतील दरी इतकी रुंद का?*

*लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींना मानधन, सुविधा आणि निवृत्तीवेतन देणे हे तत्त्वतः चुकीचे नाही. पूर्णवेळ सार्वजनिक आयुष्याला देणार्यांना सामाजिक सुरक्षितता असावी, हे तर्कसंगत आहे; परंतु प्रश्न 'असावे की नसावे' इतकाच नाही. प्रश्न आहे, किती, कोणत्या अटींवर आणि कोणत्या नैतिक आधारावर असावे? श्रीलंकेत पाच वर्षांच्या कार्यकाळानंतर खासदारांना आयुष्यभर पेन्शन मिळत होती. त्यासाठी कोणतेही योगदान आवश्यक नव्हते. सामान्य नागरिकाला मात्र दशकानुदशके सेवा करून, निवृत्तीवेतन निधीत सातत्याने भर घालून काटकसरीने जीवन जगावे लागते. राजकारण्यांना मिळणारी पेन्शन ही 'हक्क' म्हणून मांडली जाते, तर सामान्य कर्मचार्यांची पेन्शन 'योजने'च्या अटींवर अवलंबून असते. असंघटित क्षेत्रातील कामगार, शेतकरी, लघुउद्योगातील कामगार यांच्यासाठी तर सामाजिक सुरक्षितता अजूनही स्वप्नवत आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय वर्गासाठी असलेली हमीची पेन्शन व्यवस्था लोकशाहीतील समतेच्या तत्त्वाला धक्का देणारी ठरत नाही का? श्रीलंकेचा निर्णय हा लोकमताचा दबाव, आर्थिक विवंचना आणि नैतिक राजकारणाची गरज या तिन्ही घटकांचा परिणाम आहे. राज्याचा खजिना रिकामा असताना काटकसरीचे आवाहन जनतेलाच करणे आणि सत्ताधार्यांनी मात्र स्वतःसाठी सुरक्षिततेची हमी राखणे ही दुटप्पी भूमिका दीर्घकाळ टिकू शकत नाही. पेन्शन रद्द करणे म्हणजे राजकारण्यांना दंड नाही; तर 'समान नियम' या तत्त्वाची पुनर्स्थापना आहे.*

*तथापि, सक्षम आणि प्रामाणिक व्यक्ती सार्वजनिक जीवनात याव्यात, यासाठी काही प्रमाणात आर्थिक सुरक्षितता आवश्यक असते. अन्यथा राजकारण हे केवळ आर्थिकदृष्ट्या सबळ असलेल्यांचेच क्षेत्र ठरेल. म्हणूनच रद्द करणे हाच केवळ उपाय नसून सर्वांसाठी न्याय्य आणि योगदानाधारित सामाजिक सुरक्षा आराखडा उभारणे हा खरा न्याय असेल. खासदारांसाठीही सामान्य नागरिकांप्रमाणेच योगदानाधारित निवृत्ती योजना असायला हरकत नाही. ती विशेषाधिकार म्हणून नव्हे, तर समानता हा निकषांवरच हवी. सामाजिक सुरक्षितता ही काही मोजक्यांची कवचकुंडले नसून सर्व नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. श्रीलंकेतील हा विशेषाधिकारांचा त्याग हा सार्वजनिक जीवनातील नव्या शिस्तीचा पाया ठरला तरच उत्तम अन्यथा तो लोकानुनयाचा क्षणिक आविष्कारही ठरू शकतो. सामाजिक सुरक्षितता सर्वच नागरिकांचा समान हक्क आहे, ही जाणीव धोरणांत प्रतिबिंबित झाली, तरच अशा निर्णयांना ऐतिहासिक अर्थ प्राप्त होईल. अन्यथा, विशेषाधिकारांचे कवच बदलेल; परंतु विषमतेचे वास्तव तसेच राहील.*

# राष्ट्रवादी (शरद पवार) चा विरोधकांवरच बहिष्कार?



## अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या बैठकीकडे पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३मुंबई** राष्ट्रवादीने (शरद पवार) विरोधी पक्षांवरच बहिष्कार टाकल्याचे चित्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला समोर आले. परंपरेनुसार अधिवेशनाच्या आदल्या दिवशी विरोधकांची पत्र परिषद झाली, पण या पत्रपरिषदेला राष्ट्रवादी (शरद पवार) चा एकही नेता उपस्थित नव्हता. त्यामुळे विरोधकांमध्ये समन्वयचा अभाव असल्याचे दिसून आले.

विरोधक हे मुख्यमंत्र्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकतात ही आता परंपराच झाली आहे, पण अधिवेशनासाठीची रणनीती ठरविण्यासाठी विरोधी पक्षांची जी बैठक शिवालय या उद्धवसेनेच्या मंत्रालयाजवळील कार्यालयात झाली त्यात राष्ट्रवादीचा (शरद पवार) एकही नेता उपस्थित नव्हता. पत्रपरिषद सुरू होताच मित्र पक्षाचे नेते येणार आहेत, असे आ. भास्कर जाधव यांनी स्पष्ट केले. मात्र पत्रपरिषद संपल्यानंतरही कोणी आलेच नाही.

**एकोपा नसल्याचे चित्र**

मविआत एकोपा नसल्याचे चित्र यानिमित्ताने समोर आले. काही असले तरी एकदोन आमदारांना प्रतीकात्मक म्हणून बैठकीला पाठविणे शक्य होते. तेही का टाळले गेले याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. राष्ट्रवादीचे (शरद पवार) विधानसभेत एकूण दहा आमदार आहेत. विलीनीकरणाची चर्चा आता मागे राष्ट्रवादीच्या दोन गटांच्या पडली असली तरी ती त्या संदर्भातील शक्यता अद्याप संपुष्टात आलेली नाही. विलीनीकरण होईल आणि एकत्रित राष्ट्रवादी भाजपसोबत जाईल असा तर्कही दिला जात असताना आजचा 'बहिष्कार' चर्चेचा विषय ठरला आहे. आमचा पक्ष महाविकास आघाडीचाच घटक आहे. आम्ही तिन्ही पक्ष सोबत आहोत. आजच्या बैठकीत हजर राहण्याबाबत आमच्याकडूनच समन्वय होऊ शकला नाही, पण अधिवेशनात मविआचा आवाज एकत्रच राहील. **-आ. शशिकांत शिंदे,** प्रदेशाध्यक्ष,(शरद पवार गट)

# आंबा फळगळतीची कारणे समजून घेऊ या

**दि.२३ विदर्भ प्रजासत्ताक**

आंबा फळगळती ही प्रामुख्याने नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी ती ८०-९० टक्क्यांपर्यंत झाल्यास उत्पादनात मोठी घट होते. फळगळतीची नेमकी कारणे काय आहेत, हे थोडक्यात समजून घेऊयात...




फळधारणा झाल्यानंतर सुरुवातीस केवळ पेशी विभाजन होते. ते तीन आठवडयांत पूर्ण होऊन पेशींची अपेक्षित संख्या तयार झाल्यावर फळाचा आकार वाढीस लागतो. काही दिवसांनी त्यात बी वाढण्यास सुरुवात होते. या वेगवेगळ्या अवस्थेत फळ व फांदीमध्ये कमी-जास्त प्रमाणात ऑक्झिनची निर्मिती होते.

ऑक्झिन्स फांदीच्या तुलनेत फळात जास्त असतील तर फळगळ होत नाही. फळात ऑक्झिन कमी पडल्यास त्याच्या देठाजवळ एक चीर (ॲब्सिशन लेअर) पडते. त्यामुळे फळगळ होते. फळावर पडणारा सूर्यप्रकाश, तापमानवाढ, फळांवर रोग-किडींचा प्रादुर्भाव अशा कोणत्याही कारणामुळे फळातील ऑक्झिनचा नाश होतो.

**आंब्याची जात**

ज्या जातीमध्ये देठ मजबूत असतो, त्यांत फळगळ कमी होते. देठ कमकुवत असणाऱ्या जातींमध्ये फळगळतीचे प्रमाण जास्त असते.

**प्रतिकूल वातावरण**

कमाल आणि किमान तापमानातील तफावत, आर्द्रतेमधील चढ-उतार यांमुळे फळांची गळ जास्त होते. ढगाळ वातावरण, बेमोसमी पाऊस, धुके यांमुळे कीड-रोगांचा प्रादुर्भाव वाढूनदेखील फळगळ वाढते. फळे लहान असताना फेब्रुवारी-मार्च महिन्यात तापमान अचानक ३५ अंश सेल्सिसवर गेल्यास लहान फळांमधील ऑक्झिन नाश पावते, फळगळ वाढते.

**कीड-रोग प्रादुर्भाव**

फुलधारणा, फळधारणेच्या अवस्थेत तुडतुडे, फुलकिडे, अन्य रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झाल्यास फळगळ होण्याची शक्यता असते. भुरीचे पांढरे आवरण तयार होऊन मोहोर आणि अविकसित फळे गळून पडतात. करपा रोगामुळे मोहोर आणि फळांचा देठ काळा पडून सुकतो. करप्यामुळे लहान फळांची मोठ्या प्रमाणावर गळ होते.

**अन्नद्रव्य कमतरता**

योग्य अवस्थेला व मात्रेत शिफारशीनुसार अन्नद्रव्य व्यवस्थापन केले नाही, तर पोषण अपुरे पडून फळगळ वाढते.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय कृषी संशोधन सेवा केंद्र, इगतपुरी

# खजूर खाऊन का सोडला जातो 'रोजा'?

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

तुम्ही कधी विचार केला आहे का की रमजानमध्ये रोजा खजूर खाऊनच का सोडला जातो? ही केवळ धार्मिक परंपरा आहे की यामागे काही वैज्ञानिक कारणेही आहेत? या प्रश्नांची उत्तरं आपण या बातमीत जाणून घेणार आहोत.






मेडिकल सायन्सनुसार, खजूरामध्ये कार्बोहायड्रेट्स भरपूर प्रमाणात असतात. रोजा उघडताच ते शरीराला झटपट ऊर्जा देतात, गोड खाण्याची तीव्र इच्छा कमी करतात आणि भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात.

**अभ्यास काय सांगतो?**

एका अभ्यासानुसार, खजूराचा ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) कमी ते मध्यम असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते, इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारते आणि डायबेटिसचा धोका कमी होऊ शकतो.

तसेच खजूरामध्ये अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे सूज कमी करण्यास आणि ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसपासून संरक्षण करण्यास मदत करतात.

**एक्सपर्ट काय म्हणतात?**

सेलिब्रिटी न्यूट्रिशनिस्ट ठींक्षींर ऊ्रुशझरी यांचे म्हणणे आहे की, खजूर शरीरातील हिमोग्लोबिन (क्ल) आणि एनर्जी लेव्हल वाढवण्यास मदत करतो. तो झोपेशी संबंधित समस्या कमी करतो, संसर्ग व ॲलर्जीशी लढण्यास मदत करतो आणि एक्सरसाइज परफॉर्मन्स सुधारतो.

याशिवाय खजूर बद्धकोष्ठता (कब्ज) आणि ॲसिडिटीपासूनही दिलासा देतो. २०१८ मध्ये त्यांनी सांगितले होते की, वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनीही खजूर खायला हवा, कारण तो शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत करतो.महिलांसाठीही खजूर उपयुक्त असून, पाळीच्या काळात होणाऱ्या वेदना व आकडी (क्रॅम्प्स) कमी करण्यात तो फायदेशीर ठरतो.

**खजूर खाण्याचे इतर फायदे**

खजूरामध्ये फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि अनेक आवश्यक जीवनसत्त्वे असतात. हे पोषक घटक रोजा सोडल्यानंतर शरीराला ऊर्जा देतात आणि अशक्तपणा दूर करतात. खजूरामध्ये पाण्याचे प्रमाणही चांगले असल्याने दिवसभर पाणी न मिळाल्यानंतर शरीराला हायड्रेशन मिळते. त्यातील नैसर्गिक साखर सहज पचते, त्यामुळे रोजा सोडल्यानंतर पोटावर जडपणा येत नाही.फायबरमुळे पचनक्रिया सुधारते, कब्ज टाळता येतो, तर अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म सूज कमी करण्यास मदत करतात.


# कर्मयोगी संत गाडगेबाबा आणि समाजप्रबोधन

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सुधारणावादी परंपरेत १९०५ ते १९५६ असे सतत पाच दशके ज्यांनी समाज सुधारणा घडवून आणल्या, त्या कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची आज जयंती.भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र,गरीब मुला - मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, दिव्यांगांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी -मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणींचे लग्न, दुःखी व हतबल असणाऱ्यांना हिम्मत देण्याची आचरण सूत्री सांगून त्यालाच रोकडा धर्म म्हणणारे गाडगेबाबा आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी पर्वातही समाजाचा आरसा बनून मार्गदर्शन करत आहे.

गाडगेबाबा म्हणजे भारतीय समाजसुधारणेतील आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व. वैराग्याचा मूर्तिमंत अविष्कार म्हणजे गाडगेबाबा. लोकशिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ म्हणजे गाडगेबाबा.अंधश्रद्धेवर थेट प्रहार म्हणजे गाडगेबाबा. दिव्यांगांचा, निराश्रीतांचा बाप म्हणजे गाडगेबाबा.जातीभेदांवर प्रहार म्हणजे गाडगेबाबा.हिंसात्मक कुळधर्मांना, नवसाला हद्दपार करणारा कर्मयोगी म्हणजे गाडगेबाबा. मुक्या प्राण्यांच्या बळी प्रथेविरुद्धचा प्रबोधनकार म्हणजे गाडगे बाबा.थोडक्यात त्यांच्या जीवनाचे ध्येय सर्वसामान्यांचे कल्याण, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि देवधर्माच्या अंध फेऱ्यात अडकून पडलेल्या समाजाला मानवतेचा श्रेष्ठ आदर्श घालणे होते.

संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव येथे झाला. लहानपणी त्यांना डेबू म्हणत.

त्यांच्या वडिलांचे नाव झिंगराजी आणि आईचे नाव सखूबाई होते.आडनाव जानोरकर.लहानपणीच व्यसनाधीनतेने वडीलांचे निधन झाल्यामुळे ते आपल्या आईसोबतअकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे या गावी मामाकडे राहायला गेले. त्यांच्या जीवनातील प्रारंभिक काळातील संघर्षांनी,कुप्रथांनी व त्यातून आलेल्या दुःखांनी त्यांच्या मनात समाजसेवेचा आणि दीन-दुखितांच्या मदतीचे बीज रुजवले.शेती,माती,संसारामध्ये रमलेल्या डेबुजींना तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा व कुप्रथांनी समाजासाठी लढण्यास प्रवृत्त केले. १९०५ नंतर त्यांनी कुटुंब आणि संसार त्यागून गावोगावी फिरून लोकांना समाजातील दोष समजावून सांगण्याचा निर्णय घेतला.केवळ महाराष्ट्रच नाहीत तर गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश व अन्य राज्यातही त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले.



त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा भाग म्हणजे कीर्तनात्मक भजनातून अंधश्रध्दा निर्मूलन केले. आपल्या व-हाडी भाषेमध्ये सहज विनोदाची,संवादाची पेरणी करत आणि जगण्यातील विसंगती मांडत त्यांनी कर्मकांडावर हल्ला केला.त्यांचे कीर्तन म्हणजे विवेचनकार आणि श्रोते यांच्यातील प्रश्नोत्तराचा सुलभ सादरीकरणाचा प्रबोधनात्मक अविष्कार होता.या अशिक्षित माणसाच्या कीर्तनाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून आचार्य प्र.के. अत्रे, पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या विद्वानांनी खाली बसून रसग्रहण केले.साध्या सोप्या शब्दांमध्ये ते विवेचन करायचे.त्यांच्या विवेचनाला गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाचे पार्श्वगायन असायचे. विशेष म्हणजे संपूर्ण श्रोते भजन गायनात सहभागी व्हायचे.समाजाच्या अंधश्रद्धा, चाली, रुढी ,परंपरा यावर तुटून पडण्याच्या त्यांच्या आक्रमक शैलीचे वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी म्हटले होते... सिंहाला पहावे वनात, हत्तीला पाहावे रानात, गाडगेबाबांना पहावे कीर्तनात..भारतीय संत परंपरेतील क्रांतिकारक विचार मांडणाऱ्या संत तुकाराम, संत कबीर यांच्या अभंग आणि दोह्यांचा अचूक वापर ते त्यांच्या कीर्तनात करायचे...

मुला-मुलींच्या जन्मासाठी मुक्या असाह्य प्राण्यांची हत्या करून नवस फेडणे आणि त्यासाठी कर्ज काढणे अशा रूढींवर ते आक्रमणपणे प्रहार करायचे. तुकोबारायांच्या अभंगांचा वापर करताना ते म्हणायचे...

नवसे कन्या पुत्र होती
मग का करणे लागे पती

किंवा पिंडदानासारख्या अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना कीर्तनात कबीराचे दोहे वापरायचे...

जीते बाप को रोटी ना दे
वह मरे बाद पछताए
मुठ भर चावल लेकर
कौवा को बाप बनाएं

उठ सूट शेंदूर पासून देव बनवणे. पुढे त्याचे मंदिर घडविणे आणि कर्मकांडात समाजाला बुडविणे याला विरोध करताना ते म्हणायचे...

जत्रा मे पत्रा बिथाया तीर्थे बनाया पानी

भई दुनिया बड़ी दिवानी ये तो पैसे की धुलधानी

त्यांचे समाजप्रबोधनाचे विचार त्या काळातील भारतीय ग्रामीण जीवनाची परिस्थिती बदलण्याचा क्रांतीकारी प्रयत्न होते. त्या काळात भारतीय ग्रामीण भागामध्ये अंधश्रद्धा, कर्मकांड, नशा,धर्मभेद,प्राण्यांचे बळी, जातीभेद,अस्पृश्यता,हुंडा पद्धती आणि निरक्षरता या सर्व सामाजिक बंधनांनी लोकांचे मन जड झालेले होते. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनात अंधश्रद्धा, देव-धर्मा विषयी चुकीचे विश्वास आणि सार्वजनिक अस्वच्छते विरुद्ध आघात केला.

गाडगेबाबांचे कार्य सर्वसामान्यांसाठी समर्पित होते. त्यांनी सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य विषयक संदेश देण्यासाठी ते ज्या गावात प्रवेश करत, तेथे प्रथम स्वयं आणि उपस्थित लोकांना मिळून रस्ते, सार्वजनिक जागा, मंदिर परिसर, तलाव अशा सर्व ठिकाणी स्वच्छता अभियान राबवायचे.याच ठिकाणी त्यांनी धर्मशाळा, आश्रम शाळा, नद्यांचे घाट, पाणपोया, गोरक्षण उघडले. स्वतः खराटा घेऊन त्यांची स्वच्छता सुरू व्हायची.त्यांचा संदेश फक्त उपदेश स्वरूपात नव्हे तर प्रत्यक्ष कार्य करून दाखवून देण्याची प्रेरणा म्हणून होता. शेवटी २० डिसेंबर १९५६ रोजी अमरावती जिल्हयातील वलगाव येथे हा महान सुधारक अंतिम प्रवासासाठी प्रस्थान करता झाला.त्यांचा वारसा आजही जिवंत आहे - महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि राष्ट्रीय पातळीवर स्वच्छता व पाण्याच्या पुरस्कार योजना सुरु केल्या आहेत. तसेच अमरावती विद्यापीठाचे नांव संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ठेवण्यात आले आहे, हा . त्यांच्या कार्याचा सन्मान आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# स्वच्छतेचा महामेरू कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा

तीर्थी धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी... असे म्हणत समाजाला अंधश्रध्देतून बाहेर काढणारे आणि हातात झाडू घेऊन ग्रामस्वच्छतेचा मंत्र देणारे थोर संत म्हणजे गाडगे बाबा. आजच्या आधुनिक काळातही गाडगे बाबांचे विचार समाजाला दिशा देणारे आहेत. १ मे १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने या विद्यापीठाला संत गाडगे बाबांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांचे विचार व कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे, त्यांच्या विज्ञानवादी दृष्टीकोनातून नवसंकल्पनेतील विद्यार्थी तयार व्हावा, या उद्देशाने ४ मे २००५ रोजी त्यांचे नाव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला दिले.

संत गाडगे बाबांचे बालपण


संत गाडगे बाबा यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७३ साली अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यात येणा-या शेणगांव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जाणोरकर असे होते. त्यानंतर दापुरा या गावी त्यांचे बालपण गेले. अन्याया विरुध्द लढण्याची शक्ती त्यांना मिळाली. लहानपणापासूनच त्यांना समाजसेवेची ओढ होती. गरिबी आणि कष्टात वाढलेल्या संत गाडगे बाबांनी समाजातील अज्ञान जवळून पाहिले होते. संत गाडगे बाबा यांनी संसाराचा त्याग करून लोकसेवेचा मार्ग धरला आणि अंगावर गोधडी आणि हातात खापर (गाडगे) घेतले, त्यानंतर लोक त्यांना 'गाडगे बाबा' म्हणू लागले. त्यांनी कधीही स्वतःचे मंदिर बांधले नाही किंवा स्वतःची पूजा करू दिली नाही.

स्वच्छतेचा ध्यास

संत गाडगे बाबा कोणत्याही गावात गेले की सर्वात आधी ते हातात झाडू घेऊन रस्ते आणि नाले साफ करीत असे. गावक-यांनाही आपल्या श्रमातून स्वच्छतेचे महत्त्व ते पटवून देत असत. देव मंदिरात नसून तो माणसात आहे आणि परिसर स्वच्छ असेल तरच आरोग्य चांगले राहील, असा संदेश त्यांनी आयुष्यभर दिला. बाबांचा संदेश महाराष्ट्र राज्यस्तरावरच नव्हे, तर देशपातळीवर सुध्दा पोहचला. त्यांच्या नावाने स्वच्छतेसाठी पुरस्कार सुरू झालेत.

कीर्तनातून समाजप्रबोधन

संत गाडगे बाबांचे कीर्तन हे केवळ भक्तीचे साधन नव्हते, तर ते समाजप्रबोधनाचे शस्त्र होते. ते कीर्तनातून लोकांना प्रश्न विचारत तुम्ही दगडाला देव मानता, पण भुकेलेल्या माणसाला का भरवत नाही? शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते आपल्या मुलांना द्या. गाडगे बाबांनी व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन आणि हुंडाबळी यांसारख्या प्रथांवर कडाडून टीका केली. त्यांचे अखेरचे कीर्तन विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासनाच्यावतीने मुद्रित करण्यात आले. त्यांनी कीर्तनातून सर्वसामान्यांना केलेला उपदेश विद्यापीठाने पुनर्जीवित करुन सर्वांपर्यंत पोहचविला.



गाडगे बाबांची दशसूत्री

गाडगे बाबांनी समाजाला 'दशसूत्री' दिली, जी आजही अमरावती विद्यापीठात आणि समाजमनात आचरली जाते. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघडएनागडएंना वस्त्र, गरीब मुलामुलींना शिक्षण, बेघरांना आश्रय, अंध-पंगूंना औषधोपचार, मुक्या प्राण्यांना अभय, बेकारांच्या हाताला काम, दु:खी-कष्टी लोकांना धीर, गरीब तरुण - तरुणींचे लग्न अशी गाडगे बाबांची दशसूत्री आजही अनेक सामाजिक संस्था, नागरिक कसोशिने पालन करीत आहेत. विद्यापीठाच्यावतीने दशसूत्रीचे पालन तंतोतंत होत आहे. सर्व विभागांच्या दर्शनी भागावर विद्यापीठ परिसरात दशसूत्री लावलेली आहे. संविधान शिल्प या ठिकाणी सुध्दा दशसूत्री लावण्यात आली असून त्या माध्यमातून गाडगे बाबांचे रोकडाधर्मचे विचार तरूण पिढीपर्यंत पोहचत आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सपत्नीक दिव्यांग मुलींचे कन्यादान करुन एक आदर्श समाजापुढे ठेवला. याशिवाय श्री गाडगे महाराज वृध्दाश्रमातील सर्व वृध्दांना त्यांच्या हस्ते शालचे वितरण करण्यात आले.

शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे, हे ओळखून त्यांनी अनेक शाळा, धर्मशाळा आणि रुग्णालये उभारली. अमरावती येथील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे त्यांच्याच नावाने ओळखले जाते, जे आज विदर्भाच्या शैक्षणिक प्रगतीचे केंद्र आहे. गाडगे बाबांचे कार्य पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे देखील प्रभावित झाले होते. गाडगे बाबांनी आपल्या अनेक संस्थांची जबाबदारी योग्य व्यक्तींकडे सोपवून नि:स्पृह भावनेने कार्य केले. संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार कार्य करणा-या संस्था, व्यक्तींना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून दरवर्षी पुरस्कृत करण्यात येते. याही वर्षी येत्या २६ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार-२०२५ कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे. कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृति श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २००३ पासून विद्यापीठाने सुरू केला. आजवर २२ संस्था व व्यक्तींना हा पुरस्कार देवून विद्यापीठाने सन्मानित केले आहे. यावर्षीपासून हा पुरस्कार व्यक्ती व संस्था गटात स्वतंत्रपणे दिला जात आहे. यावर्षी व्यक्तीगटात श्री मनिष रमेशराव पावडे, अमरावती यांना तर संस्थागटात दिव्या फाऊंडेशन, वखंड, जि. बुलडाणा या संस्थेला प्रदान होत आहे. प्रत्येकी ५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. संत गाडगे बाबांनी सांगितलेली सामाजिक सेवा, दशसूत्रीनुसार कार्य करण्यासाठी समाजातील अनेक व्यक्ती वा संस्थांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांचे कार्यापासून अनेकांना सामाजिक कार्याची प्रेरणा मिळावी, हा महत्तम उद्देश आहे. २० डिसेंबर १९५६ रोजी या थोर महात्म्याने अमरावती शहरालगत असलेल्या वलगाव नजीक पेढी नदीकाठी अखेरचा श्वास घेतला. त्या ठिकाणी आज त्यांच्याच नावाने गोरगरीबांसाठी वृध्दाश्रम देखील सुरू आहे. गाडगे बाबांनी दिलेला स्वच्छता आणि विषमतेविरुध्दचा लढा आजही जिवंत आहे. गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला या त्यांच्या आवडत्या भजनाप्रमाणेच त्यांचे कार्य आजही महाराष्ट्राच्या कानाकोप-यात घुमत आहे. विद्यापीठातील अध्यासन केंद्राच्या माध्यमातून सुध्दा गोरगरीबांना कपडे वाटप, समाजप्रबोधनात्मक विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन बाबांचे कार्य व विचारांचा प्रचार व प्रसार केल्या जात आहे. संत गाडगे बाबांना त्यांच्या जयंतीप्रसंगी अभिवादन.

**-डॉ. विलास नांदुरकर**
जंनसंपर्क अधिकारी
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# मेळघाटात खासदारांचा इशारा !

# ४० हजार आदिवासी मजुरांच्या अस्तित्वासाठी खासदार बळवंत वानखडे रणांगणात

## केंद्राच्या मजूरविरोधी धोरणांविरुद्ध 'मनरेगा बचाव यात्रा'चा एल्गार

### हजारो मजुरांचा उसळता जनसागर रस्त्यावर





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ मेळघाट**

केंद्र सरकार जाणीवपूर्वक मनरेगा कायदा कमकुवत करून तो इतर योजनांमध्ये विलीन करण्याचा प्रयत्न करत आहे. ग्रामीण व आदिवासी मजुरांच्या हक्काची कायदेशीर हमी काढून घेण्याचा हा डाव असून मेळघाटातील ४० हजार मजुरांचे आयुष्य या योजनेवर उभे आहे. मजुरांच्या हक्कावर कुठलाही घाला घातला, तर रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष उभारू, असा थेट इशारा खासदार बळवंतराव वानखडे यांनी दिला. चिखलदरा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित 'मनरेगा बचाव यात्रे'चे नेतृत्व करताना ते बोलत होते.माजी मंत्री ड. यशोमती ठाकूर व काँग्रेस पक्षाचे अमरावती जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या संकल्पनेनी यात्रेची सुरुवात करण्यात आली.

दुर्गम भागात झंझावाती दौरा; मजुरांच्या वेदनांना थेट स्पर्शकाजलडोह येथून प्रारंभ झालेली यात्रा डोमा, बामादेही, काटकुंभ, बगदरी, गांगरखेडा, कोरडा आणि काला पांढरी, कामिदा या अतिदुर्गम गावांमधून मार्गक्रमण करत गेली. ठिकठिकाणी हजारो मजुरांनी उत्स्फूर्त स्वागत करत आपल्या समस्या मांडल्या. खासदार वानखडे यांनी मजुरांच्या रांगेत बसून त्यांच्याशी संवाद साधत त्यांच्या न्याय्य हक्कासाठी संसदेपासून रस्त्यापर्यंत लढण्याची ठाम ग्वाही दिली.

४० हजार कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न; भीषण संकटाची चाहूलसभेला संबोधित करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, मेळघाटातील जवळपास ४० हजार मजूर कुटुंबे केवळ मनरेगाच्या उत्पन्नावर जगत आहेत. जर हा कायदा कमकुवत केला किंवा इतर योजनांमध्ये समाविष्ट करून त्याची स्वतंत्र ओळख संपवली, तर हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल. मोठ्या प्रमाणावर स्थलांतर वाढेल आणि आर्थिक विवंचना तीव्र होईल.त्यांनी पुढे ठाम मागणी केली की मनरेगा मजुरी किमान ४०० रुपये प्रतिदिन करण्यात यावी आणि १०० दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी प्रभावीपणे कायम ठेवावी. केंद्र सरकार राज्यांवर आर्थिक बोजा टाकून योजना निष्प्रभ करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत त्यांनी तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला.

(कलर बॉक्स)यात्रेतील ठोस मागण्या१. मनरेगा मजुरी दर प्रतिदिन किमान ४०० रुपये करण्यात यावा.२. १०० दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी कायम ठेवून बळकट करावी.३. मनरेगा कायद्याची स्वतंत्र ओळख कायम ठेवावी व तो इतर योजनांमध्ये विलीन करू नये.४. मजुरीची १००% देयके केंद्र सरकारने वेळेवर आणि थेट अदा करावीत.

या यात्रेचे नियोजन तालुकाध्यक्ष सहदेव बेलकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल येवले, पीयूष मालवीय आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केले.यावेळी विक्की राठोड, राजेश सेमलकर, किशोर झाडखंडे, राकेश झाडखंडे, सोनाजी सावलकर, सज्जू कासदेकर, ललिता बेठेकर, रामलाल काळे, विनायक कवडे, अंकुश कवडे, सुखदेवराव कवडे, महिपतसिंग उईके, शेख नौशाद, संदीप अलोकार, सुनील उईके, अमित बेलकर, हेमू आठोले, धनराज आठोले, वर्मासिंग सलामे, चितराम बेठेकर, संदीप मुंडे, मिलिंद सेमलकर, संजू जामुनकर, जय झाडखंडे, पतिराम चिमोटे, राजकुमार बेलकर यांच्यासह हजारोंच्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मनरेगामध्ये कार्यरत रोजगार सेवक व मजूरवर्ग उपस्थित होता.

या यात्रेला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे मेळघाटातील आदिवासी मजुरांमध्ये नव्या लढ्याची ऊर्जा निर्माण झाली असून, पुढील काळात हा संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# वाढत्या घरफोडींना आळा घालण्यासाठी वरिष्ठ अधिकारी मैदानात

## शहराच्या प्रवेशद्वाराजवळ प्रत्येक वाहनांची तपासणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

शहरात चोरी व घरफोडीचे वाढते प्रमाण लक्षात घेता शहर पोलिसांनी कंबर कसली असून डिसीपी आणि एसीपी रस्त्यावर उरतले आहेत. तसेच संपूर्ण शहरात नाकाबंदी करून प्रत्येत वाहन चालकांची ते कसून चौकशी करीत आहेत.शहरात चोरी व घरफोडीच्या घटना सतत समोर येत आहेत. चोरट्यांनी सर्वसामान्य नागरिकांसह न्यायाधीश व वकीलांच्या घरालासुध्दा टार्गेट केल्यामुळे शहर पोलिसांची झोप उडाली आहे. एकाच रात्री पाच न्यायाधीश व न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या घरी चोरी झाल्यामुळे पोलीस यंत्रणा खळबळून जागी झाली आहे. मात्र अद्यापही पोलिसांच्या हाती कुठलाच सुगावा लागलेला नाही. मात्र चोरीच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे शहर पोलिसांनी चोरी व घरफोडीच्या घटनेला आळा बसावा याकरिता संपूर्ण शहरात रात्री १२ ते २ आणि २ ते ४ या वेळेत विशेष नाकाबंदी सुरु केली आहे. नाकाबंदीमध्ये एसीपी आणि डिसीपी यांच्यासह ठाणेदार, डिबी कर्मचारी आणि वाहतुक विभागाचे कर्मचारी सुध्दा राहणार आहे आणि ये-जा करणारे प्रत्येक वाहनांची तपासणी करून वाहन चालकांची सुध्दा संपूर्ण माहिती घेण्यात येत आहे. तसेच संबंधित चालक रात्री कुठे गेला होता आणि कुठे जात आहे. कोणते काम करतो कुठे राहतो याबाबत सर्व माहिती पोलीस घेत आहेत.

### याठिकाणी राहणार नाकाबंदी

कठोरा नाका, वलगाव-चांदुरबाजार-परतवाडा वाय पॉईट, लालखडी चौक, वडाळी नाका, यवतमाळ टी पॉईंट, रहाटगाव चौक, दस्तुरनगर चौक, चौधरी चौक, पार्वतीनगर रेल्वे गेटजवळ, भातकुली चौक या ठिकाणी राहणार आहे. विशेष नाकाबंदी तसेच या दरम्यान पोलीस ठाण्यातील काही कर्मचारी आपआपल्या परिसरात कोंम्बिंग ऑपरेशन सुध्दा राबविणार आहेत. रविवारी मध्यरात्रीपासून शहरात पोलिसांची वर्दळ दिसणार आहे.

# दर्यापूरच्या सोमानी जिनिंगला भीषण आग, आगीचे नेमके कारण काय ?

## आग लागली की लावली शहरात चर्चेला उधाण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३दर्यापूर** –दर्यापूर ते अकोला रोड वरील सोमाणी जिनिंगला आग लागल्याची घटना घडली असून या आगीमध्ये जिनिंग मधील लाखो रुपयांचा कापूस जळून खाक झाला आहे . विशेष म्हणजे या आगीत शेतकऱ्यांचा सुद्धा विकण्यासाठी आणलेला कापूस जुळून खाक झाला . आचार्य जनक बाब अशी की सोमाणी जिनिंगला दर वर्षी कापसाची आवक वाढताच जिनिंगला कुठल्या ना कुठल्या कारणाने आग लागल्याचे बोलल्या जात आहे .शहरात अशी सुद्धा चर्चा आहे की सदर जीनिंग मालक हा दर वर्षी विमा काढतो व त्या विमाचा लाभ जिनिंग मालक आग लागण्यानंतर घेतो त्या मुळे सोमाणी जिनिंग ची आग ही आता चर्चेत आली आहे. आग विझवण्यासाठी दर्यापूर नगर पालिकेचे अग्निशामक दलाचे वाहन प्राचारण करण्यात आले . आग मोठ्या प्रमाणात वाढल्याने अचलपूर,अंजनगाव,भातकुली, अकोट येथून सुद्धा अग्निशामक वाहन प्राचारन करण्यात आले होते. आगीत जिनिंग मालकाचे नुकसान झाले असले तरी मात्र शेतकऱ्याचे यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.वारंवार याच जीनिंग ला आग लागत असल्याने या जीनिंग ची चौकशी करण्यात यावी अशी मागणी आता शेतकरी बांधव करत आहे.–

# थकितदारांच्या यादीत मनपाचा पहिला क्रमांक

# अमरावती मनपावर मजीप्राचे सुमारे २०४ कोटी थकित

## थकबाकीसाठी मजीप्राचे महापालिका प्रशासनाला पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–**

नागरिकांना थकित मालमत्ता टॅक्स भरण्यासाठी सांगणाऱ्या महापालिकेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अर्थात मुजीप्राचे सुमारे २०४ कोटी रुपये थकित आहे. त्यामुळे महानगरपालिकेचामहाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) ची सर्वांत मोठी थकबाकीदाराच्या यादीत वरचा नंबर आहे. २०४ कोटी या रकमेच्या वसुलीसाठी मजीप्राने मनमाला पत्र पाठवले असून तत्काळ भरणा करण्याचे सूचित केले आहे.

महापालिका दरवर्षी मालमत्ता नागरिकांकडून करासोबत पाणीपट्टी वसूल करते, मात्र ती रक्कम मजीप्राकडे वेळेवरजमा केली जात नाही. यामुळे गेल्या काही वर्षांत पालिकेवर १२० कोटी रुपयांची थकबाकी जमा झाली होती. त्यावर सुमारे ८४ कोटी रुपयांचा दंड आणि व्याज आकारण्यात आल्याने एकूण थकबाकी २०४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

मजीप्राने महापालिकेला ही रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. ही थकबाकी मिळाल्यास शहरवासीयांना अधिक चांगल्या सेवा पुरवता येतील, असे मजीप्राने म्हटले आहे. शहरातील झोपडपट्टी परिसर, सोयी-सुविधांच्या दृष्टीने मागासलेला भाग आणि गरीब नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी मनपाने सार्वजनिक पाणीपुरवठायोजना सुरू केली आहे. मात्र, या योजनेसाठीची पाणीपट्टी मजीप्राकडे नियमितपणे भरली गेली नाही. त्यामुळे मनपा उपायुक्तांच्या नावावरील मजीप्राचे बिल २०४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

सध्या महापालिका शहराच्या विविध भागांमध्ये मालमत्ता करवसुली शिबिरे आयोजित करत आहे. मार्चमध्ये संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर दिवाळीपासूनच वसूल केला जात आहे आणिडिसेंबरनंतर न भरल्यास दंडही आकारला जातो. असे



असतानाही मजीप्राचे बिल भरण्याकडे मात्र महापालिकेने दुर्लक्ष केल्याचे मजीप्राच्या वार्षिक अहवालातून स्पष्ट होते.दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची एकूण थकबाकी ४२७ कोटी रुपये आहे. यामध्ये अमरावती महानगरपालिका सर्वात मोठी थकबाकीदार आहे.याशिवाय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, समाज कल्याण विभाग, जिल्हा स्त्री रुग्णालय, सुपर स्पेशालिटी रुग्णालय, मध्यवर्ती कारागृह, जिल्हा सामान्य रुग्णालय, १०४ क्वॉर्टर्स पोलीस वसाहत, जलसंपदा कार्यालय, जिल्हा क्षयरोग रुग्णालय आणि कृषी उत्पन्न - बाजार समिती यांसारख्या सरकारी कार्यालयांचाही थकबाकीदारांमध्ये समावेश आहे.मजीप्राचा दरमहा खर्च सुमारे ३ कोटी रुपये आहे. पाणीपुरवठ्यासाठी वापरल्या न जाणाऱ्या विजेचे बिल दरमहा १ कोटी ६० लाख रुपये येते, जो न मजीप्राचा सर्वाधिक खर्चाचा भाग न आहे. याव्यतिरिक्त, जलशुद्धी करणासाठीची रसायने, जलवाहिन्या व जलकुंभांची न देखभाल-दुरुस्ती, वसुली पथकासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे ये मानधन आणि कर्मचाऱ्यांचे वेतन त यावरही मजीप्राला मोठी रक्कम खर्च करावी लागते.

# २२५ केद्रांवर २७,८८८ विद्यार्थी परीक्षेला हजर

## सर्वत्र पोलिसांचा चोख बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती –**



जिल्ह्यात इयता पाचवी व आठवी करिता रविवारी २२५ केंद्रांवर शिष्यवृत्तीची परीक्षा शांततेत पार पडली, दोन्ही वर्गातील २७ हजार ८८८ विद्यार्थ्यांनी ही परिक्षा दिली. मात्र विविध कारणांमुळे १,१११ विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित होते.पूर्वउच्च प्राथमिक इयतापाचवी व पूर्व माध्यमिक इयता आठवी करिता शिष्यवृत्ती परीक्षा रविवार, २२ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यात पार पडली. इयत्ता पाचवीकरिता जिल्ह्यात एकूण १३४ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आले होते. याकरिता १८,४४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले असताना यापैकी १७ हजार ७७८ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. मात्र ६७० विद्यार्थ्यांनी अनुपस्थिती दर्शविली तसेच इयत्ता आठवीकरिता ९१ परीक्षा केंद्रांवर १०,५५१ विद्यार्थी प्रविष्ट असतानाप्रत्यक्षात १०,११० विद्यार्थ्यांनी र परीक्षा दिली तर ४४१ विद्यार्थी अनुपस्थित होते. जिल्ह्यात एकूण २२५ केंद्रांवर २७,८८८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर ११११ विद्यार्थ्यांनी मात्र परीक्षेला दांडी मारली. अमरावती शहरात सर्वाधिक पाचवीसाठी १७ व आठवीकरिता १२ अशी २९ केंद्रांवर परीक्षा झाली. अचलपूर, वरूड, धारणी, मोर्शी, अंजनगाव सुर्जी आदी तालुक्यांतही मोठ्या संख्येने विद्यार्थी परीक्षेलाबसले होते. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी शिक्षण विभागाकडून अधिकारी, कर्मचारी सज्ज करण्यात आले होते. यामध्ये २२५ केंद्र संचालक व १४३९ पर्यवेक्षक असे एकूण १६६४ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. याशिवाय परीक्षेवर जिल्हास्तरावर दोन व तालुक्यास स्वतंत्र असे एकूण १६ पथकाचा वॉच होता. जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत आणि शांततेत पार पडली. प्रशासनाकडून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली.

### शिक्षणाधीकाऱ्यांची भेट

पं. स. भातकुलीचे शिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांनी रविवारला शिष्यवृत्ती परीक्षेच्या विविध परीक्षा केंद्राला भेटी दिल्या. संत गाडगेबाबा विद्यालय सायत (केंद्र आसरा) येथील वर्ग ५ वी केंद्राला भेट दिली व मार्गदर्शन केले.

# ५५५ ग्रामपंचायतींचे नकाशे तहसीलदारांच्या कक्षेत

## प्रभाग रचनेच्या प्रारुपाची घोषणा ३० मार्चला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील ५५५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, २० फेब्रुवारी रोजी तहसीलदारांनी संबंधित गावांचे नकाशे ताब्यात घेतले असून प्रभाग रचनेचे काम सुरू केले आहे. महसूल आणि ग्रामविकास प्रशासनाच्या देखरेखीखाली हे काम सुमारे दीड महिना चालणार असून, ३० मार्च रोजी मतदार संघाचे प्रारूप घोषित केले जाईल. या प्रारूप रचनेवर १३ एप्रिलपर्यंत हरकती व सूचना नोंदवता येणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या राज्यभरातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका आगामी काळात होणार आहेत. यात अमरावती जिल्ह्यातील ५५१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे, तर चार ग्रामपंचायतींचा कार्यकाळ २०२४ मध्येच संपला आहे. अशा प्रकारे, जिल्ह्यातील एकूण ५५५ ग्रामपंचायतींसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे.



आयोगाच्या वेळापत्रकानुसार, पुढील आठवडाभरात ग्रामसेवक आणि तलाठी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून ग्रामपंचायतींच्या मतदारसंघांच्या सीमा निश्चित करतील. त्यानंतर, ५ मार्चपर्यंत मंडळ अधिकारी, बीडीओ आणि तहसीलदार यांच्या संयुक्त समितीतर्फे तलाठी व ग्रामसेवकाने दिलेल्या अहवालाची पडताळणी केली जाईल.

अशा प्रकारे तयार झालेल्या मतदारसंघांच्या सीमांची माहिती संबंधित एसडीओमार्फत ११ मार्चपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली जाईल. जिल्हाधिकारी त्यांच्या स्तरावर मतदारसंघांच्या सीमांकनाची पुन्हा पडताळणी करतील आणि आवश्यकता वाटल्यास त्यात योग्य त्या दुरुस्त्या करतील. त्यानंतर, अंतिम मसुदा राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला जाईल.

आयोगाने निश्चित केलेल्या सीमेनुसार, ३० मार्च रोजी प्रभाग रचनेचे प्रारूप घोषित केले जाईल. हे प्रारूप ग्रामपंचायतींसह जिल्हा परिषद मुख्यालय आणि तहसील कार्यालयांमध्ये नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून दिले जाईल. यावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात येतील. हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख १३ एप्रिल असून, एसडीओ यांच्या न्यायालयात २३ एप्रिलपर्यंत सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

सुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतींच्या मतदारसंघांची रचना अंतिम टप्प्यात पोहोचेल. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत २८ एप्रिलपर्यंत ही अंतिम रचना राज्य निवडणूक आयोगाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पाठवली जाईल.

# सण जवळ, रेल्वे गाड्या दूर; अमरावतीत होळी स्पेशलचा ठावठिकाणाच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

होळीनिमित गृहनगरात येणाऱ्या अंबानगरीतील प्रवाशांची संख्या हजारोच्या घरात असतील तरी अद्याप अमरावती मडिल रेल्वे स्टेशनवरून एकही थेट होळी स्पेशल रेल्वे मुंबई, पुणे, सुरत, जबलपूरसाठी मिळाली नाही. होळीला १० विक्स शिल्लक असताना तसेच मध्य रेल्वे शेकडो गाड्यांची दररोज घोषणा करीत असताना अमरावतीची पाटी कोरी असल्यामुळे रेल्वे प्रवाशांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहेत. अनेकांनी नाराजीही व्यक्त केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील अनेक चाकरमाने, विद्यार्थी, व्यापारी, खासगी नोकरदार हे मुंबई, पुणे या महानगरांमध्ये सध्या वास्तव्यास आहेत. परंतु, कोणत्याहीमोठ्या सण-उत्सवाला साजरे करण्यासाठी ते गृहनगरात येत असतात. सर्वात उपयोगी व स्वस्त पर्याय हा रेल्वे असल्यामुळे अमरावतीला येण्यासह परत जाण्यासाठी रेल्वेचे आरक्षण आधीच करून ठेवले



जाते. तरीही अनेक प्रवासी असे असतात ज्यांना आरक्षण मिळत नाही. त्यामुळे त्यांना इतर पर्यायी वाहनांचा वापर करण्याशिवाय पर्याय नसतो. अनेकजण तर खासगी वाहनानेच मग गृहनगरात येतात. परंतु, रेल्वेच्या तुलनेत हा प्रवास महागडा ठरतो. मोठ्या संख्येतप्रवासी असतानाही मध्य रेल्वेने होळीसाठी अमरावतीहून कोणतीही होळी स्पेशल ट्रेन ना मुंबईसाठी, ना पुण्यासाठी, ना सुरतसाठी, ना जबलपूरसाठी दिली आहे. त्यामुळे सध्या प्रवाशांमध्ये रोष निर्माण झाला आहे. मध्य रेल्वेने तत्काळ दखल घेत या दोन्ही महानगरांसाठी किमान एक ते दोन होळी विशेष ट्रेन द्याव्यात अशी मागणी जोर धरायला लागली आहे.जाणाऱ्या विशेष गाडया असल्या तरी नागपूरहून बडनेरा मार्गे मुंबई, पुण्याला यासाठी प्रवाशांना १२ कि.मी. अंतरावरील बडनेरापर्यंत जावे लागते. तसेच तेथून गृहनगरात यावे लागते. यात खर्च होतो. त्या तुलनेत जर थेट अमरावतीपर्यंत विशेष रेल्वे असली तर ती सुविधाजनक ठरते. कारण, अमरावतीहूनच त्याने आरक्षण मिळवून परत जाता येते, असे प्रवाशांना वाटते.

# महाराष्ट्रात अस्मानी संकट!: विदर्भात पावसाचा धुमाकूळ, तर कोकणात आंबा धोक्यात

## हवामान विभागाचा ७ जिल्ह्यांना 'येलो अलर्ट'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. रविवारी मध्यरात्रीपासून विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह जोरदार अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे काढणीला आलेल्या रब्बी पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असून, दुसरीकडे कोकणात सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे आंबा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे.

भारतीय हवामान विभागाने २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी राज्याच्या अनेक भागांत पावसाचा अंदाज वर्तवला आहे. मराठवाड्यातील नांदेड, लातूर, धाराशिव, हिंगोली तर विदर्भातील गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज असून येथे 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर आणि निफाड परिसरातही ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाची शक्यता आहे.

**विदर्भात पावसाचा हाहाकार; नागपूर जलमय**

नागपूर शहरात रविवारी मध्यरात्री जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाने झोडपून काढले. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. मनिष नगर परिसरातील अंडरपासमध्ये गुडघाभर पाणी साचल्याने वाहनधारकांची मोठी कोंडी झाली.

भंडाऱ्यात पहाटे ५ वाजल्यापासून पावसाचा जोर वाढला. याचा फटका चना, तूर, मूग आणि उडीद या कडधान्यांसह फुलोऱ्यावर आलेल्या भाजीपाल्याला बसला आहे. मात्र, उन्हाळी भात पिकासाठी हा पाऊस लाभदायक असल्याचे बोलले जात आहे.

गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव, देवरी आणि सालेकसा तालुक्यात सोमवारी सकाळपासून पावसाच्या सरी कोसळत आहेत. येथेही बागायतदार शेतीला फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

**कोकणात 'हापूस' संकटात**



रत्नागिरी जिल्ह्यात रविवारी झालेल्या अवकाळी पावसाने आंबा बागायतदारांची झोप उडवली आहे. सध्या आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणावर मोहोर आला असून काही ठिकाणी फळेही लागली आहेत. मात्र, वादळी वाऱ्यामुळे मोहोर आणि कोवळी फळे गळून पडल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे.

**निफाडमध्ये राज्यातील निचांकी तापमानाची नोंद**

निफाड येथे राज्यातील निचांकी तापमानाची नोंद झाली. निफाड येथे ११.६ सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. मुंबईतील सांताक्रूझ येथे राज्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथे ३६.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. दुपारी उन्हाचा चटका आणि रात्री पाऊस अशा विचित्र हवामानामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत असून मुंबईतील वायू प्रदूषण धोकादायक पातळीवर पोहोचले आहे.

# २६ नक्षल्यांचा मुक्त विद्यापीठात पूर्वतयारी अभ्यासक्रमासाठी प्रवेश

## मतदार ओळखपत्र मिळाल्याने १०३ नक्षलवाद्यांनी केले मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

राज्य सरकारच्या सर्वोत्तम आत्मसमर्पण धोरणामुळे सुरक्षित आणि सुखी जीवनाची गॅरंटी मिळत असल्याने नक्षली शरण येत आहेत. या आत्मसमर्पित नक्षल्यांना सरकारतर्फे सर्व सोयी-सुविधा देण्यात येत आहे. शरण आलेल्या ४ महिला नक्षलींसाठी सुसज्ज अशा रोहाऊस'चे बांधकाम केले जात आहे. आतापर्यंत सव्वीस नक्षल्यांनी मुक्त विद्यापीठात पूर्व तयारी अभ्यासक्रमात प्रवेश घेतला असून मतदार ओळखपत्र तयार झाल्याने १०३ नक्षल्यांनी मतदान केल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी दिली. आत्मसमर्पित नक्षल्यांना विविध योजनांचे लाभ दिले जात आहे. प्रधानमंत्री आवास योजना, शबरी, आदिम, रमाई योजनेतंर्गत घरकुले मंजूर करून दिली जात आहेत, तर सामूहिक विवाह सोहळ्यात ४६ आत्मसमर्पित नक्षल्यांचे विवाह लावून देण्यात आले. २००५ ते २०२५ या कालावधीत ३५ आत्मसमर्पित नक्षलवाद्यांपैकी १३ नक्षली आईबाबा झाले. लॉयड्स मेटल अँड एनर्जी



कंपनीत ७२ आत्मसमर्पित नक्षल्यांना रोजगार देण्यात आली. त्यांना कंपनीचे समभागही देण्यात आले. तर महिला नक्षल्यांचे बचत गट तयार करण्यात येऊन त्यांना रोजगार देण्यात आले.

एकूण २७६ नक्षली चकमकीत मारले गेले, तर कधी पोलिस खबरी असल्याचे सांगून, कधी अन्य कारणांनी नक्षल्यांनी २८३ निष्पाप नागरिकांचा जीव घेतला आहे. माओवादी मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ अभय ऊर्फ सोनू ऊर्फ भूपती याने सुमारे ६० सदस्यांसह मंगळवार, १४ ऑक्टोबर २०२५ रोजी आत्मसमर्पण केले. त्या नंतर मंगळवार, १८ नोव्हेंबर रोजी सर्वोच नक्षल कमांडर व पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचा प्रमुख माडवी हिडमा हा चकमकीत ठार झाला. यामुळे नक्षल चळवळीला जबर धक्का बसलाच, शिवाय मोठी हानीही झाली.

### आतापर्यंत एकूण ७९४ नक्षली शरण

आतापर्यंत एकूण ७९४ नक्षली शरण आले. पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत गडचिरोली पोलिसांतर्फे आतापर्यंत ३४८ नक्षल्यांना आधार कार्ड, २२५ जणांना पॅन कार्ड, बँक पासबुक : ३१३, जॉब कार्ड : १०१, रेशन कार्ड : १७५, मतदान ओळखपत्र : १०३, भूखंड : १५३, घरकुल : ८७, गॅस कनेक्शन :४९, जात प्रमाणपत्र : १२४ देण्यात आले आहे.

# ऑक्सिजन पार्कमधील वृक्षतोडीमुळे खळबळ

## अचलपुरातील हरित क्षेत्राला धक्का; वीज विभागावर गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अचलपूर :**

शहरातील ऑक्सिजन पार्क परिसरात अलीकडेच झालेल्या मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे नागरिक व पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वीज वाहिन्यांच्या देखभालीच्या नावाखाली गरजेपेक्षा अधिक हिरवीगार झाडे तोडण्यात आल्याचा आरोप असून, यासाठी आवश्यक परवानगी घेतली नसल्याचेही



सांगितले जात आहे. त्यामुळे ऑक्सिजन पार्कसारख्या महत्त्वाच्या हरित क्षेत्राच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. संघटनांचा आक्षेपआदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेचे वनश्री अध्यक्ष योगेश खानजोडे यांनी या प्रकाराचा तीव्र निषेध करत प्रशासनाकडे जाब मागितला आहे.

वीज वाहिन्यांसाठी छाटणी आवश्यक असेल, तरी ती मर्यादित व नियमांनुसारच व्हायला हवी होती, असे त्यांनी स्पष्ट केले. कारवाईची मागणीया प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे ठरवावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

पर्यावरण संतुलनराखण्याचे आवाहनविकासकामांसोबत पर्यावरण संरक्षणाचा समतोल राखावा, वृक्षतोडीऐवजी समान संख्येने वृक्षारोपण करून त्यांची योग्य निगा राखावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून होत आहे.

# एमईसीबी परीक्षा पुढे ढकलावी, दोनशे किमी अंतरावर दिले केंद्र


## आ प्रताप अडसड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धामणगाव रेल्वे**

एमईसीबी परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना भेडसावत असलेल्या अडचणींची गंभीर दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून आ प्रताप अडसड यांनी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या अडचणी मांडल्या दरम्यान याविषयी सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे आश्वासन फडणवीस यांनी दिले

परीक्षेसाठी अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून दूरवर परीक्षा केंद्र देण्यात आल्यामुळे प्रवास, निवास, आर्थिक अडचणी तसेच वेळेचे नियोजन यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून आमदार अडसड यांनी तातडीने मुख्यमंत्री फडवणीस यांच्याशी संवाद साधून विद्यार्थ्यांचा मुद्दा ठामपणे मांडला..

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसून अचानक दूरच्या केंद्रावर जाणे त्यांच्यासाठी आव्हानात्मक ठरत आहे. काही विद्यार्थ्यांना रात्रीचा प्रवास करावा लागणार असून, सुरक्षिततेच्या दृष्टीनेही चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीची मर्यादित उपलब्धता, अनियमित वेळापत्रक आणि वाढलेला खर्च या सर्व बाबी विद्यार्थ्यांसाठी अडथळा ठरत आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयावर सकारात्मक भूमिका घेत विद्यार्थ्यांच्या समस्या



गांभीर्याने ऐकून घेतल्या. त्यांनी संबंधित विभागाशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. विद्यार्थ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती पावले उचलली जातील, असेही त्यांनी सांगितले.

आमदार प्रताप अडसड यांनीही विद्यार्थ्यांना धीर देत सांगितले की शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी दूरचे सेंटर आले आहे त्यांनी आपल्या सोयीनुसार परीक्षेसाठी जाण्याची तयारी ठेवावी. शासनाकडून निर्णय जाहीर होताच त्याबाबत अधिकृत माहिती दिली जाईल. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न लक्षात घेता आ प्रताप अडसड यांच्या पुढाकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे. अनेक पालकांनीही या हस्तक्षेपाचे स्वागत केले आहे.-

# फारकत झाल्यानंतरही पत्नीवर अनैसर्गिक कृत्य

## व्हिडीओ काढून व्हायरल करण्याची दिली धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** फारकत झाल्यानतर पत्नीला विश्वासात घेऊन तिच्यावर जबरदस्ती अनैसर्गीक कृत्य केले आणि तो व्हिडीओ काढून व्हायरल करण्याची धमकी दिल्याची घटना राजापेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आली. याघटनेत पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासात घेतला. अजय भाऊराव अंभोरे (वय ३२ रा. सरोज कॉलनी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित महिलेचे अजय अंभोरे सोबत ७ जुलै २०१७रोजी विवाह झाला होता. लग्नानंतर दोघे व्यवस्थित राहत होते. दरम्यान त्यांच्यात पटत नसल्यामुळे ९ जानेवारी २०२५ रोजी त्यांनी फारकत घेण्याकरिता न्यायालयात प्रकरण दाखल केले. दोघे वेगवेगळे राहत होते. दरम्यान काही दिवसानंतर अजयने पत्नीला विश्वासात घेऊन घरी बोलाविले आणि केस मागे घेतो असे म्हणून दोघे सोबत राहू लागले. दरम्यान दोघे काही दिवस पुण्यात राहिले.त्यानंतर अजय काही कामनिमित्त अमरावतीला आला आणि पीडिता तिच्या आईच्या घरी यवतमाळला गेली. दुसऱ्या दिवशी अजय हा दारुच्या नशेत पीडिताच्या घरी गेला आणि त्याच रात्री त्याने पीडितावर जबरदस्ती अनैसर्गिक कृत्य करून व्हिडीओ काढला. त्यानंतर ती पुण्याला निघून गेली आणि पती अमरावतीत परत आला. दरम्यान पीडिताने ओळखीच्या मयूर नामक युवकाच्या मोबाईलचे व्हॉट्सअॅप स्टेटस पाहिले असता पतीने दुसरे लग्न केल्याचे दिसताच तिने पतीला फोन लावला आणि फारकत झाली नाही तरी सुध्दा दुसरा विवाह केला कसा, अशी विचारणा केली. त्याने आपली फारकत झाली आहे. तसेच तू काही केले तर तुझा काढलेला व्हिडीओ व्हायरल करेल अशी धमकी दिली. त्यामुळे पीडिता अमरावती आली आणि राजापेठ ठाण्यात धाव घेतली. घडलेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चौकशी सुरु केली आहे.

# ईश्वरी भक्ती,मानवी कल्याणच्या मार्गावर चला

## अर्चना अडसड – रोठे यांचे आवाहन

### संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक.**
**दि.२३धामणगाव रेल्वे**

परमहंस ब्रम्हानंद लहरी बाबा हे एक थोर अवलिया संत होते. त्यांनी आपल्या शिकवणीतून ईश्वरी भक्ती आणि मानवी कल्याणाचा मार्ग सांगितला त्यांच्या मार्गावर चालणे आपले आद्य कर्तव्य असल्याचे मत नगराध्यक्ष अर्चना अडसड -रोठे यांनी व्यक्त केलेतालुक्यातील जळगाव आर्वी येथे संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ झाला यावेळी नगराध्यक्ष अर्चना अडसड - रोठे यांच्या हस्ते कलश स्थापना करण्यात आली तर प्रमुख उपस्थिती धामणगाव न. प. बांधकाम सभापती मंजिरी भोगे, सरपंच सत्यभामा कांबळे, सुंनदा मुडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होतीमागील अनेक वर्षापासून जळगाव आर्वी येथे संत लहरी बाबा पुण्यतिथी महोत्सव सात दिवस साजरा करण्यात येतो या सप्ताहाला रविवारपासून प्रारंभ झाला. संत लहरी बाबा देवस्थानाला आतापर्यंत आमदार प्रताप अडसड यांनी क वर्ग व निधी उपलब्ध करून दिला आहे. हे भव्य तीर्थस्थळ व्हावे यासाठी आमदार प्रताप अडसड व आमचे प्रयत्न असल्याचे अर्चना अडसड – रोठे म्हणाल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संत लहरी बाबा देवस्थानचे अध्यक्ष डॉ अनंत मुडे यांनी तर संचालन मंगेश भुजबळ यांनी केलेकलश स्थापनेवेळी ग्रामस्थांची उपस्थिती होती सात दिवस विविध धार्मिक आयोजित केले आहे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र व मनपा आरोग्य विभागाच्या वतीने महिला मेळावा व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

कामगारांच्या कल्याणासाठी व कामगार कुटुंबासाठी सदैव महाराष्ट्र शासनाचे कामगार कल्याण केंद्र राधा नगर व मनपा अमरावती चे आरोग्य विभाग या संयुक्त विद्यमानाने महिला मेळावा मधे विविध योजनेचे मार्गदर्शन व शेकडो महिलांचे मोफत आरोग्य शिबिर केंद्र संचालक बबन बिडकर व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांचे आदेशानुसार व डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांचा सहकाऱ्याने घेण्यात आले ह्या कार्यक्रमात महिलांनी रोजगार कसा करावा व कोणते प्रशिक्षण घ्यावे याची माहिती कामगार कल्याण अधिकारी सुनील चव्हाण यांनी दिली ,डॉ रुपेश खडसे साथ रोग



नियंत्रण अधिकारी यांनी स्वच्छता व शहरातील डेंग्यू,मलेरिया ,चिकन गुनिया होऊ नये या बाबत प्रतिबंधात्मक उपाय योजना सांगितल्या,आरोग्य निरीक्षक हैदर अली यांनी डेंग्यू ,मलेरिया , चिकन गुनिया , हत्तीरोगाचे डास कसे असतात व ते कधी चावतात याचे प्रात्यक्षिक करून दाखवले डॉ.काशीफ अली शाह वैद्यकीय अधिकारी राधा नगर यांनी शेकडो महिला यांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार केला ,डॉ मनीष ठाकरे वैद्यकीय अधिकारी विलासनगर यांनी सुद्धा औषधी पुरवल्या .कामगार नेते रामकृष्ण चिखलकर यांनी सुद्धा महिलांनी उद्योग धंदा सुरू करून आर्थिक बाजूने मजबूत होऊन आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले, डॉ जावरकर यांनी कार्यक्रम असाच नेहमी व्हावा ह्या साठी मदत करण्याचे आश्वासन दिले ह्या कार्यक्रमात राजेश खडसे ,आरोग्य सेवक निलेश लाडे, विशाल शिंदे ,अफवान अहमद, विजय चव्हाण ,प्रतीक्षा चव्हाण सुनीता झाडे ,प्रतिभा थोरात राजश्री शिरसाट ,पल्लवी गवई, मनीष पेठे , रंजना भावते, पूजा चोपडे यांनी आरोग्य शिबीरासाठी सहकार्य केले ह्या शिबिराची चर्चा संपूर्ण राधा नगर मध्ये होत असून बबन बिडकर व राजेश खडसे यांचे कौतुक होत आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडिया चा क्रेडिट आऊटरिच प्रोग्राम मध्ये २६ कोटी रुपयाचे कर्ज वाटप

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती** सेंट्रल बैंक ऑफ इंडिया च्या क्षेत्रीय कार्यालय अमरावतीने संत गाडगे महाराज सभागृह अमरावती येथे दिनांक २१/०२/२०२६ रोजी रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. तुषार दांडगे (गट विकास अधिकारी, भातकुली) हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. श्री. प्रदीप जावंधिया (प्राचार्य, पी. आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, अमरावती) सौ. मनीषा ठाकरे (जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला) आणि श्री. सुनील पांडे




(क्षेत्रीय प्रमुख, अमरावती) हे होते. श्री सुनील पांडे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला आणि उपस्थितांना बँकेच्या विविध रिटेल योजनांची माहिती दिली. श्री. तुषार दांडगे यांनी बँकेच्या क्रेडिट आउटरीच ह्या उपक्रमाचे कौतुक केले तसेच उपस्थितांना बँकेच्या सुविधांचा लाभ घेण्याचे आणि कर्जाची वेळेवर परतफेड करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाध्ये विविध रिटेल योजनामधे २६ कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आलेसूत्रसंचालन निलेश मुंढेकर यांनी तर आभार प्रदर्शन निलेश सगने यांनी केले.

# नऊ वर्षांच्या तस्मिया कशफचा पहिला रोजा

## देशात अमन-शांतीसाठी केली दुआ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धामणगाव रेल्वे**

पवित्र रमजान महिन्यात जिथे मोठे-ज्येष्ठ इबादतीत मग्न असतात, त्याच वेळी धामणगाव रेल्वे शहरातील गोयनका परिसरात राहणाऱ्या एजाज खान यांची नऊ वर्षांच्या चिमुकली तस्मिया कशफ यांनी आपला पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. एवढ्या लहान वयात तिची जिद्द, संयम आणि इबादतीप्रती असलेली निष्ठा पाहून कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकही भावूक झाले. तस्मिया कशफ ने यावर्षी रमजानमध्ये पहिल्यांदाच रोजा ठेवला. ती बराच काळ रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त करत होती. घरातील मोठ्यांना रोजा पाळताना पाहून तीही रोजा ठेवण्याचा आग्रह धरत होती. अखेर कुटुंबीयांनी तिच्या भावनांचा आदर करून तिला पहिला रोजा ठेवण्यास परवानगी दिली.

सेहरीसाठी ती पहाटे उत्साहाने उठली आणि दिवसभर संयम, शिस्त व धैर्य राखत रोजा पूर्ण केला. इफ्तारच्या वेळी रोजा सोडताना तिने सर्वप्रथम अल्लाहसमोर हात जोडून देशात अमन-शांती, आपापसातील भाईचारा आणि सामाजिक सौहार्द नांदावे यासाठी दुआ मागितली.आपल्या देशात सर्वांनी मिळून-मिसळून राहावे आणि सर्वत्र शांतता नांदावी, असे तस्मिया कशफ ने सांगितले. तिची निरागस भावना ऐकून उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आले. कुटुंबीयांच्या मते तस्मिया अभ्यासातही हुशार असून धार्मिक व सामाजिक मूल्ये समजून घेण्याचा ती प्रयत्न करत असते. परिसरातील नागरिकांनी तिचे कौतुक करून शुभेच्छा व आशीर्वाद दिले. तस्मिया कशफ च्या या कृतीतून समाजाला सकारात्मक संदेश मिळतो की धर्माचा खरा हेतू मानवता, प्रेम आणि एकता यांना बळ देणे हा आहे. एवढ्या लहान वयात व्यक्त झालेली ही व्यापक विचारसरणी भविष्यात देशात सौहार्द आणि भाईचाऱ्याची भक्कम पायाभरणी करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मेळघाटातील डॉक्टर राजीनामा प्रकरण चिघळले

## प्रशासनाचा खुलासा आणि डॉक्टरांचा प्रतिवाद आमने-सामने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

मेळघाटातील धारणी तालुक्यातील बैरागड प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत चाटवाबोड येथील आयुर्वेदिक दवाखान्यात कार्यरत वैद्यकीय अधिकारी डॉ. शिल्पा वानखडे यांच्या राजीनाम्यानंतर निर्माण झालेला वाद आता अधिकच तीव्र झाला आहे. मानसिक छळामुळे आपण राजीनामा दिल्याचा आरोप करत डॉ. वानखडे यांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले असताना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत खुलाशातून हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यामुळे प्रशासन आणि संबंधित डॉक्टर यांच्यातील आरोप-प्रत्यारोप आता उघडपणे आमनेसामने आले आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या निवेदनानुसार, डॉ. वानखडे या जुलै २०२५ मध्ये सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करून देण्यात आले होते. रुजू झाल्यानंतर काही दिवसांतच स्थानिक कर्मचाऱ्यांशी त्यांचे मतभेद निर्माण झाले. या मतभेदांचा परिणाम रुग्णसेवेवर होत असल्याच्या तक्रारी गावकऱ्यांकडून प्राप्त झाल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. परिस्थिती सुरळीत करण्यासाठी प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. धम्मदीप भगत यांनी मध्यस्थी केली तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तिलोत्तमा वानखडे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन संबंधितांची समजूत काढत तोंडी ताकीद दिल्याचेही खुलाशात स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशासनाच्या मते, वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर रुग्णसेवा अबाधित राहावी म्हणून डॉ. वानखडे यांना अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रात पदस्थापनेचा पर्याय देण्यात आला होता; मात्र त्यांनी तो स्वीकारला नाही. त्यानंतर त्या अनधिकृतरीत्या गैरहजर राहिल्या आणि विविध स्तरांवर तक्रारी सादर करत प्रकरण प्रसारमाध्यमांपर्यंत नेले, असा आरोप प्रशासनाने केला आहे. मानसिक छळाचे आरोप निराधार असून प्रशासनाने वेळोवेळी सामंजस्याने तोडगा काढण्याचा प्रयत्न केला, असा दावा जिल्हा आरोग्य विभागाने केला आहे. दरम्यान, डॉ. शिल्पा वानखडे यांनी प्रशासनाचा हा खुलासा वस्तुस्थितीपासून दूर आणि एकतर्फी असल्याचे सांगत त्यास ठाम विरोध दर्शविला आहे. निवासस्थान अत्यंत दयनीय अवस्थेत देण्यात आले होते व त्याची दुरुस्ती स्वतःच्या खर्चाने करावी लागल्याचा त्यांचा दावा आहे. संबंधित आरोग्य सेविका गायत्री उपराळे, कविता कोहळेकर या प्रत्यक्ष रुग्णसेवेत सहभाग घेत नसून केवळ कागदोपत्री या काम करीत असल्याची तक्रार आपण तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे केली होती; मात्रआरोग्य सेविका अनेक वर्षांपासून त्याठिकाणी कार्यरत असून त्यांना याबाबत बोलणे संयुक्तीत ठरणार नाही असे म्हणत त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले, असा आरोप डॉ. वानखडे यांनी केला आहे. याशिवाय, आरोग्य सेविका कर्मचाऱ्यांकडून वारंवार विद्युत व पाणीपुरवठा खंडित करून मानसिक त्रास देण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. गावकऱ्यांना आपल्या विरोधात तक्रारी करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आल्याचा आणि कर्तव्यावर असताना टोमणे मारण्याचा प्रकार झाल्याचाही त्यांनी आरोप केला आहे. मेळघाटासारख्या दुर्गम व आदिवासी बहुल भागात वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असताना एका महिला डॉक्टरचा राजीनामा आणि त्यानंतर समोर आलेले परस्परविरोधी दावे यामुळे आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन अधिकृत नोंदींवर आपली भूमिका ठाम असल्याचे सांगत असले, तरी संबंधित डॉक्टरांकडून करण्यात येत असलेल्या गंभीर आरोपांमुळे स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीची मागणी जोर धरत आहे. या प्रकरणात वस्तुस्थिती काय, जबाबदारी कोणाची आणि प्रशासनिक पातळीवर त्रुटी झाल्या का, याबाबत स्पष्टता येईपर्यंत हा वाद शमण्याची चिन्हे दिसत नाहीत.

### मुख्यमंत्री,आरोग्यमंत्री यांना तक्रार देणार

मी माझा राजीनामा हा वैद्यकीय अधिकारी आणि दोन्ही आरोग्य सेविका यांच्या मानसिक छळाला कंटाळून दिला.याबाबत मी वरिष्ठांना तक्रार देऊनही एक वैद्यकीय अधिकारी असतांना माझ्या तक्रारीला केराची टोपली दाखवणे आणि डॉ. भगत, आरोग्य सेविका उपराळे व कोहळे यांना अभय देणे असा असा दुटप्पीपणा तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी दाखविला.माझ्यासारख्या अनेक वैद्यकीय अधिकाऱ्यांना या मानसिक छळाला सामोरे जावे लागले त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अन्यथा याविरोधात आपण मुख्यमंत्री व आरोग्यमंत्री यांना लेखी तक्रार सादर करू

**डॉ. शिल्पा वानखडे**

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर संपन्न

## घर घर संविधान व पाणलोट व्यवस्थापन यावर विशेष भर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित स्व. बाबासाहेब व-हाडे शिक्षण संस्थाद्वारे संचालित संत गाडगे महाराज महाविद्यालय वलगाव यांचे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सत्र २०२५-२०२६ चे विशेष श्रम संस्कार शिबिर ग्राम सावरखेड ता .भातकुली जि.अमरावती येथे दिनांक ८ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी २० २६ या कालावधीत उत्साहात संपन्न झाले.या शिबिराचे उद्घाटन डॉ. सुनील केदार यांच्या हस्ते व डॉ. दिनेश निचित यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले शिबिरात बौद्धिक सत्रात घर घर संविधान या विषयावर डॉ. प्रकाश जवंजाळ यांनी संविधानाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन करून संविधानाचे महत्त्व पटवून दिले तर पाणलोट व्यवस्थापनात गावकऱ्यांचा सहभाग कसा महत्त्वाचा आहे ते मा. प्रिती ताई देशमुख प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा अमरावती यांनी पटवून सांगितले तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे समाजापैकी कार्य या विषयावर डॉ. अरविंद जोशी यांनी मार्गदर्शन केले तर स्पर्धा परीक्षेसंबंधी भारती मामंनकर झडख (वलगाव पोलीस स्टेशन )यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले शिबिरात रोज सकाळी प्रार्थना, योगासने, ग्रामसफाई, श्रमदान व प्रभात फेरी यांनी सुरुवात व्हायची तर संध्याकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांचे व गावकरी महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात व्हायचे

या श्रम संस्कार शिबिराताच आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले,शिबिरात डॉ वैशाली वानखडे ,डॉ मंजुषा काळमेघ व त्यांच्या चमुने गावकऱ्यांचे आरोग्य तपासणी करून मोफत औषध वाटप केले. आरोग्य तपासणी शिबिराला गावकऱ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. बौद्धिक क्षेत्रात डॉ ज्ञानेश्वर यावले ऍड शीतल मेटकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तसेच शिबिरात गावकरी महिलांनी रांगोळी स्पर्धा भजन स्पर्धा व इतर स्पर्धेत महिलांनी आवडीने सहभाग घेतला व प्रोत्साहन पर बक्षीस मिळवलीत .गावातील जी. प शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील वृक्षारोपणात व सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला सावरखेड येथील शिबिरात सर्व गावकरी महिला पुरुष मंडळी हजेरी लावून शिबिराविषयी आनंद व्यक्त केला संस्था अध्यक्ष डॉ.आकाश व-हाडे व प्राचार्य डॉक्टर दिनेश निचित यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाधिकारी प्रा प्रिया खोरगडे डॉ संजय वाघ प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्वांचे सहकार्य लाभले.

# महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र व मनपा आरोग्य विभागाच्या वतीने महिला मेळावा व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि २३अमरावती**

कामगारांच्या कल्याणासाठी व कामगार कुटुंबासाठी सदैव महाराष्ट्र शासनाचे कामगार कल्याण केंद्र राधा नगर व मनपा अमरावती चे आरोग्य विभाग या संयुक्त विद्यमानाने महिला मेळावा मधे विविध योजनेचे मार्गदर्शन व शेकडो महिलांचे मोफत आरोग्य शिबिर केंद्र संचालक बबन बिडकर व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांचे आदेशानुसार व डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांचा सहकाऱ्याने घेण्यात आले ह्या कार्यक्रमात महिलांनी रोजगार कसा करावा व कोणते प्रशिक्षण घ्यावे याची माहिती कामगार कल्याण अधिकारी सुनील चव्हाण यांनी दिली ,डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांनी स्वच्छता व शहरातील डेंग्यू,मलेरिया ,चिकन गुनिया होऊ नये या बाबत प्रतिबंधात्मक उपाय योजना सांगितल्या,आरोग्य निरीक्षक हैदर अली यांनी डेंग्यू ,मलेरिया , चिकन गुनिया , हत्तीरोगाचे डास कसे असतात व ते कधी चावतात याचे प्रात्यक्षिक करून दाखवले डॉ.काशीफ अली शाह वैद्यकीय अधिकारी राधा नगर यांनी शेकडो महिला यांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार केला ,डॉ मनीष ठाकरे वैद्यकीय अधिकारी विलासनगर यांनी सुद्धा औषधी पुरवल्या .कामगार नेते रामकृष्ण चिखलकर यांनी सुद्धा महिलांनी उद्योग धंदा सुरू करून आर्थिक बाजूने मजबूत होऊन आरोग्य शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले, डॉ जावरकर यांनी कार्यक्रम असाच नेहमी व्हावा ह्या साठी मदत करण्याचे आश्वासन दिले ह्या कार्यक्रमात राजेश खडसे ,आरोग्य सेवक निलेश लाडे, विशाल शिंदे ,अफवान अहमद, विजय चव्हाण ,प्रतीक्षा चव्हाण सुनीता झाडे ,प्रतिभा थोरात राजश्री शिरसाट ,पल्लवी गवई, मनीष पेठे , रंजना भावते, पूजा चोपडे यांनी आरोग्य शिबीरासाठी सहकार्य केले ह्या शिबिराची चर्चा संपूर्ण राधा नगर मध्ये होत असून बबन बिडकर व राजेश खडसे यांचे कौतुक होत आहे.

# चांदुरबाजार तालुक्यातील प्राचीन स्वयंभू नंदिकेश्वर देवस्थान

## वणी बेलखेडा येथील हे देवस्थान राज्य शासनाच्या 'क' वर्गा मध्ये शामिल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ चांदूर बाजार**

चांदुर बाजार तालुक्यातील वणी बेलखेडा येथील ऐतिहासिक नंदिकेश्वर शिवमंदिराला राज्य शासनाने क वर्गा मध्ये शामिल केले आहे हे ऐतिहासिक शिवमंदिर चांदुर बाजार ग्रामीण भागाच्या परिसरात अनेक भक्तांचे श्रद्धास्थान मानले जाते राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सन १९३५ साली या शिवमंदिरात खंजेरी वाजवली होती विशेष म्हणजे हे शिवमंदिर साक्षात जागृत देवस्थान असल्याची श्रद्धा आहे त्यामुळे शिवरात्री महोत्सवात या शिवमंदिरात ऐतिहासिक शिवलिंगाला नतमस्तक होण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळते सन १९३५ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी महाराष्ट्राच्या मध्यप्रदेश सीमेवर असलेलं सारबर्डी येथे लहान महादेव मानल्या जाणाऱ्या परिसरात महायज्ञ करण्यात आला होता महायज्ञा वेळी उपस्थित असलेले संत श्री किसनजी महाराजांनी वणी बेलखेडा येथील प्राचीन शिवमंदिराबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना माहिती दिली असता तुकडोजी महाराजांनी वणी बेलखेडा येथे भेट दिली मंदिर परिसर पाहून त्यांनी हे देवस्थान साक्षात जागृत असल्याचे सांगितले व त्या ठिकाणी खंजेरी वाजवली त्यांनतर विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते या धार्मिक सोहळ्यात गावकऱ्यांसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता मंदिराचा जीर्णोद्धारही करण्यात आला तर काही वर्षे धार्मिक कार्यक्रम बंद पडले मात्र १९९० च्या दशकात रमेशपंत काळे महाराज येथे दर्शनासाठी आले असता त्यांना सुद्धा साक्षात्कार झाल्याच गावकर्यांना सांगितले असता वणी बेलखेडा येथील ग्रामस्थांनी अखंड शिवपुराण करण्याचा संकल्प केला गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागातून हा धार्मिक उपक्रम सुरू झाला आणि गेल्या ३५ वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे यंदाच्या शिवरात्री महोत्सवत विविध धार्मिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते महाशिवरात्रीच्या दिनी भव्य शोभायात्रा देखील काढण्यात आली होती तर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला होता तर तालुक्यात अश्याच अनेक ऐतिहासिक प्राचीन देवस्थानाकडे कडे शासनाचे दुर्लक्ष आहे त्यामुळे तीर्थ क्षेत्राच्या निधिचा वापर करून अशा तीर्थक्षेत्रा ची आता सुधारणा केली पहिजे.

# विदर्भातील पांढऱ्या सोन्याला तपकिरी अन् हिरव्या रंगाची झळाळी

## नागपूरच्या कापूस अनुसंधान केंद्रात यशस्वी प्रयोग




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

कापसाचा रंग कोणता? असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचं उत्तर एकच असेल ते म्हणजे पांढरा. कापसाला विदर्भातील पांढरं सोनं म्हणून ओळख मिळाली आहे. मात्र, भविष्यात पांढऱ्या रंगाच्या कापसाच्या जोडीला तपकिरी आणि हिरवा रंगाच्या कापसाचं उत्पादन विदर्भातील शेतकरी घेऊ शकणार आहेत. अशक्य वाटणारा हा प्रयोग नागपूर येथील कापूस अनुसंधान केंद्रात अनेक वर्षांच्या निरंतर आणि अथक प्रयत्नांनंतर यशस्वी झाला आहे.

तपकिरी रंगाच्या कापसात आढळले दोन प्रकार : तपकिरी रंगाच्या कापसात दोन प्रकार आढळले आहेत. पहिला म्हणजे, फिकट (लाईट) तपकिरी आणि दुसरा म्हणजे गडद (डार्क) तपकिरी रंगाचा कापूस. हिरव्या रंगाच्या कापसाचा रंग स्थिर नसल्यामुळं त्यावर अद्याप संशोधन सुरू आहे. कापसाचे बोंड ज्यावेळी फुटते तेव्हा सूर्य प्रकाशाच्या संपर्कामध्ये आल्यानंतर हिरवा कापसाचा रंग फिकट होतो. तर तपकिरी कापूस आणखी गडद होत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे. तपकिरी आणि हिरव्या कापसाच्या व्यतिरिक्त इतरही रंगाचा कापूस उत्पादनाचा प्रयत्न केला जाणार आहे, अशी माहिती डॉ. विजय वाघमारे यांनी दिली.

रंगीत कापूस प्रजातीमध्ये उपलब्ध आहे. कापसाच्या विविध प्रजातींचं वाण (जम्प प्लाझम) नागपूरच्या (भाकृअनुप) केंद्रीय कापूस अनुसंधान केंद्रामध्ये साठवले आहेत. अमेरिकेत कापसाची अधिक प्रमाणात लागवड केली जाते. विविधता असलेल्या ४० पेक्षा जास्त कापसाच्या प्रजातीच्या वाणांची साठवणूक केली आहे. त्यामुळं भविष्यात अनेक रंगाच्या कापसाचा प्रयोग होऊ शकतो, असं डॉ. विजय वाघमारे यांनी सांगितलं.

तपकिरी रंगाच्या कापसाचं वैशिष्ट्य म्हणजे तो कापूस जंगली प्रजातींचा उपयोग करून तयार केला आहे. त्याचं 'वैदेही वन' नामक वाण आहे. २५ वर्षांनंतर हे वाण विकसित झालं आहे. सुरुवातीला कापसाचं बोंड उघडतं किंवा फुटतं तेव्हा त्याचा रंग अगदी फिकट असतो. त्याच्यावर जितका जास्त सूर्यप्रकाश पडेल तेवढा त्याचा तपकिरी रंग गडद होतो. तपकिरी रंगाच्या कापसावर अनेक वेळा प्रयोग करून झाले आहेत. वारंवार धुतल्यानंतर सुद्धा याचा रंग फिका पडत नाही. याच्या उलट हिरवा रंगाच्या कापसाचा बोंड ज्यावेळी फुटतो त्यावेळी कापसाचा रंग गडद असतो. मात्र, सूर्यप्रकाशात तो फिका पडतो, असं निरीक्षण डॉ. विजय वाघमारे यांनी नोंदवलं.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# संदर्भ सेवा रुग्णालय अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला, कामाची घेतली दखल

## 'सुपर'ला आरोग्य रत्न, महा आरोग्य सन्मान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल)अमरावतीला आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. रुग्णालयाला वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार तसेच महा आरोग्य सन्मान २०२६ प्रदान करून गौरवण्यात आले आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवा, जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा प्रभावीपणे प्रदान केल्याबद्दल तसेच कर्तव्यनिष्ठा, सेवाभाव आणि समाजहिताच्या योगदानाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.रुग्णालयात जवळपास आतापर्यंत करण्यात आलेल्या उल्लेखनीय कार्यामध्ये झालेल्या शस्त्रक्रिया. या सर्व प्रगत वैद्यकीय सुविधांचा लाभ महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आला आहे. या भरीव कार्याचा विचार करून रुग्णालयास हा प्रतिष्ठित सन्मान प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार सोहळा यशवंतरावचव्हाण सेंटर, सभागृह, मुंबई येथे झाला. कार्यक्रमास कॅबिनेट आरोग्य मंत्री प्रकाश आंबीटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, - मुंबईचे उपमहापौर संजय घडी तसेच आरोग्य विभागाचे सचिव डॉ. रवींद्रम, आयुक्त कादंबरी व बलकवडे, संचालक डॉ. नितीन अंबाळेकर, सहसंचालक डॉ. विजय कंदेवाळ, डॉ. सुनीता गोलाईत, उपसंचालक डॉ. दीपचंद सोयान, डॉ. सुशील वाकचौरे व इतर मान्यवर उपस्थित होते.

रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे आणि डॉ. माधव ढोपरे यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार व प्रशस्तीपत्र स्वीकारले.या यशामुळे अमरावतीसह संपूर्ण विदर्भाच्या आरोग्य सेवेला नवे बळ मिळाले असून, भविष्यातही अधिक उत्कृष्ट व दर्जेदार सेवा देण्याचा संकल्प रुग्णालय प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# युवाशक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख : जनरल मनोज पांडे

## विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न








**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ अमरावती**

तरुण पिढी ही केवळ देशाचे नागरिक नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणा-या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर.एम. कडू, श्री हर्षवर्धन देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. आर.डी. सिकची, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. विद्या शर्मा, डॉ. ए.एम. बोर्डे, डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, अधिष्ठाता डॉ. अरूण हरणे, डॉ. एच. आर. देशमुख, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे, तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. व्ही.आर. मानकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

जनरल मनोज पांडे यांनी या प्रसंगी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'तीन सी' चा मंत्र दिला. चरित्र, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि नैतिक धैर्य हे उत्तम माणसाचे लक्षण आहे. विद्यार्थ्यांनो हेच गुण तुम्हाला योग्य मार्ग निवडण्यास मदत करतील. आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य सतत अद्ययावत ठेवा. आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासा. शिस्त, सांघिक कार्य आणि सहानुभूती या गुणांमुळे तुम्ही समाजात वेगळी ओळख निर्माण करू शकाल. बदलाचा स्वीकार करा. ते पुढे म्हणाले, प्रगती ही बदलाशी जोडलेली असते. जुन्या विचारसरणीला आव्हान देऊन नवनवीन कल्पनांचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. केवळ प्रयत्न करून थांबू नका, तर परिणामांवर आणि सकारात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

आजच्या तांत्रिक युगावर भाष्य करताना ते म्हणाले की, तंत्रज्ञान आपली क्षमता वाढवत असले तरी, भावनिक बुध्दिमत्ता आणि मानवी मूल्ये यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर करताना माणुसकी विसरू नका. यावेळी जनरल पांडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षकांच्या आणि प्राध्यापकांच्या असलेल्या भूमिकेचे विशेष कौतुक केले. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मार्गदर्शक तारे आहेत, जे त्यांना जीवनाच्या प्रवासात योग्य दिशा दाखवतात, असे त्यांनी आवर्जून सांगितले. शेवटी, तुम्ही ज्ञानाचे दूत आणि बदलाचे वाहक म्हणून जगात वावरा. देशाच्या प्रगतीची मशाल तुमच्या हातात आहे, असेही त्यांनी युवकांना सांगितले.

नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील कु. निकीता किशोर पुनसे या विद्यार्थीनीने ०६ सुवर्ण व १ रोख पारितोषिक, आर.ए. कला, एम.के. वाणिज्य व एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील कु. पल्लवी बालकृष्ण राठोड या विद्यार्थीनीने ०५ सुवर्ण व रौप्य १ रोख, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव येथील कु. तेजस्विनी विठ्ठल भगत आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील कु. साईडारी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थीनीने प्रत्येकी ४ सुवर्ण पारितोषिके प्राप्त केली आहेत. दीक्षांत समारंभात या विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते पदके व रोख पारितोषिके देवून गौरवान्वित करण्यात आले. दीक्षांत समारंभात ८० टक्के पदके मुलींना, तर २० टक्के पदके मुलांना मिळाली.या दीक्षांत समारंभात विद्याशाखानिहाय ४६६ संशोधकांना आचार्य पदवी देवून सन्मानित करण्यात आले. पदके प्राप्त करणा-यांमध्ये निकीत टिकैत या दिव्यांग विद्यार्थ्याचा सुध्दा समावेश आहे. या प्रसंगी अधिष्ठात्यांनी पदवीकांक्षी व आचार्य पदवीकांक्षींना सादर केले. यावेळी कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना अनुग्रह दिला.

**कृत्रिम बुध्दिमत्तेशी जुळवून घेत विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे पादाक्रांत करावीत : कुलगुरू**

आजचे युग हे 'एआय' अर्थात कृत्रिम बुध्दिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या बदलांना घाबरून न जाता नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. एआय हे रोजगाराची नवीन दालने उघडणारे तंत्रमित्र ठरेल, असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषण करतांना व्यक्त केले. विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते.

विद्यापीठाशी सध्या ४५१ महाविद्यालये संलग्न असून सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावर्षी ४२,३१७ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. बदलत्या काळानुसार विद्यापीठाने पदवी स्तरावरील सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमात 'एआय'चा अनिवार्य घटक म्हणून समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. विद्यापीठाने संशोधनात मोठी झेप घेतली असून, यावर्षी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटंट मिळवण्यासह एकूण १२ पेटंट्सवर मोहोर उमटवली आहे. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून अभ्यासक्रम अद्ययावत करण्यावर सतत भर दिला जात आहे. 'इंद्रधनुष्य' सारख्या इतरही आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये आणि खेलो इंडिया, सॉफ्ट बॉल स्पर्धा सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे कुलगुरूंनी कौतुक केले. संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचे पालन करत विद्यापीठ गरजू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना आणि विविध शिष्यवृत्ती राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. कुलगुरूंनी आपल्या भाषणाचा शेवट संत तुकाराम महाराज आणि कवी केशवसुत यांच्या ओळींनी करत विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, विद्यापीठ गीत व सरस्वती स्तवनाने दीक्षांत समारंभाची सुरुवात झाली. पाहुण्यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अतिथींचा परिचय करुन दातृनामावलीचे वाचन केले. संचालन डॉ. सुलभा पाटील व डॉ. प्रणव कोलते यांनी केले. पसायदानाने व राष्ट्रगीताने दीक्षांत समारंभाची सांगता झाली. कार्यक्रमाला सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री भूषण गवई, महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, माजी प्र-कुलगुरू डॉ. व्ही.एस. जामोदे, डॉ. प्रसाद वाडेगावकर, माजी कुलसचिव डॉ. वंदन मोहोड, प्रा. सी.डी. देशमुख, डॉ. बी.आर. वाघमारे, डॉ. तुषार देशमुख तसेच डॉ. ज्योता मिलींद बारहाते, प्रा. स्वाती महेंद्र ढोरे व सौ. ओजस्विनी अविनाश असनारे तसेच एन.सी.सी.चे अधिकारी, शासकीय अधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सर्व सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, पाचही जिल्हातील गुणवत्ताधारक विद्यार्थी, आचार्य पदवीधारक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक याशिवाय शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कमलताई गवई यांना अमरावती विद्यापीठाची डी.लिट. प्रदान

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाच्या दीक्षांत समारंभात सन्माननीत





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

बिहार, सिक्कीम व केरळचे माजी राज्यपाल तथा रिपाइंचे ज्येष्ठ नेते दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या सुविद्य पत्नी डॉ. कमलताई गवई यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून राज्यशास्त्र विषयात संशोधनात्मक डी.लिट सर्वोच्च पदवी मिळविली आहे,आज अमरावती विद्यापीठाच्या ४२व्या दीक्षान्त समारंभात डॉ. कमलताई गवई यांना मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत राज्यशास्त्र विषयात वायय पंडित (डी.लिट) या सर्वोच्च पदवीने सन्मानित करण्यात आलं आहे. माजी भारतीय सेनाप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या हस्ते ही पदवी त्यांना सन्मानित केली गेली. डॉ. कमलताई गवई या देशाचे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती भूषण गवई यांची मातोश्री आहेत. डॉ. कमलताई यांचे विपश्यना, सामाजिक क्षेत्रात भरीव योगदानअमरावतीनजीकच्या मोगरा येथे डॉ. कमलताई गवई यांच्या अथक परिश्रमातून विपश्यना केंद्र साकारण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून विशेष विपश्यना शिबिर, ध्यानसाधना निरंतरपणे सुरू आहे.

# भरधाव पिकअप वाहन दरीत कोसळले चार प्रवासी ठार तर सात जखमी

## नारदु गावाजवळील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धारणी**

धारणी तालुक्यात रविवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी झाले आहेत. मध्यप्रदेश सीमेलगत असलेल्या देडतलाई येथील साप्ताहिक बाजारावरून परतताना नारदू गावाजवळील शिवझिरा घाटात पिकअप वाहन पलटी होऊन दरीत कोसळून ही दुर्घटना घडली. या घटनेमुळे कंजोली व परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कंजोली राणी व परिसरातील सुमारे ३० ते ४० नागरिक पिकअप वाहनाने मध्यप्रदेशातील देडतलाई बाजारात खरेदीसाठी गेले होते. बाजार आटोपून कंजोलीकडे परत येत असताना शिवझिरा घाटात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पिकअप व्हॅन अचानक मागे येत पलटी झाली आणि ५० फूट दरीत कोसळली. वाहनाखाली काही प्रवासी चिरडले गेल्याने चार जणांचा घटनास्थळीचदुर्देवी मृत्यू झाला यामध्येसुकरई बिसराम धांडे (४५), बाबुलाल माटु दहीकर (६२), किसन तानु धांडे आणि सिताराम पटेल सेलुकर (५२, सर्व रा. कंजोली) अशी आहेत. जखमींमध्ये कन्याकुमारी मिनेश ठाकरे (३३), अंश मिनेश ठाकरे (८), ग्यारू प्यारसिंग देवरे (३०, रा. मोथाखेडा), शांता श्रीराम जावरकर (४०), अर्चना राजेशदारसिंबे (३०), लक्ष्मी रामदास दारसिंबे (२८), देवा बिसराम धांडे (१५) आणि सरगम मंगल राठौड (४०, रा. सीनबन) यांचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच धारणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांनी तत्काळ आपल्या ताफ्यासह घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी धारणी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. जखमींवरउपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून प्रकृती चिंताजनक असलेल्या जखमींना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे.या दुर्दैवी अपघातामुळे कंजोली गावावर शोककळा पसरली असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून धारणी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# दै. विदर्भ प्रजासत्ताकच्या संपादिका डॉ. शुभांगी अरुण जोशी यांना इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

इंग्रजी विषयातील सखोल अभ्यास, संशोधनाची आवड आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर महिला महाविद्यालया येथील प्रा. डॉ. शुभांगी अरुण जोशी यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय प्रख्यात लेखिका व समाजसेविका सुधा मूर्ती यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तिरेखांच्या परिवर्तनाचा अभ्यास हा होता.डॉ. शुभांगी जोशी यांनी आपल्या प्रबंधामध्ये सुधा मूर्ती यांच्या साहित्यामधील स्त्री पात्रांच्या प्रवासाचे सखोल विश्लेषण केले आहे. सामाजिक बंधने, परंपरा, संघर्ष, आत्मभान आणि सक्षमीकरण या विविध पैलूंमधून स्त्री व्यक्तिरेखा कशा घडत जातात, याचा अभ्यास त्यांनी संशोधनातून मांडला आहे. त्यांच्या या अभ्यासामुळे इंग्रजी साहित्यातील स्त्रीवादी दृष्टिकोनाला नव्या दृष्टीने अधोरेखित करण्यात मदत झाली आहे.या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रा. डॉ. विष्णु शेकोकार (विद्याभारती महाविद्यालय, अमरावती) यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रबंध यशस्वीरीत्या पूर्ण झाला.त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रात तसेच कुटुंबीय, मित्रपरिवार आणि शुभेच्छुकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे कौतुक केले जात आहे.डॉ. शुभांगी जोशी यांचे हे यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे असून संशोधन क्षेत्रात पुढे जाणाऱ्या तरुणांसाठी दिशा दर्शक आहे.

# अमरावतीच्या राहुल नगरात डमी अश्रूधूर नळकांडी फुटल्याने खळबळ; नागरिकांची उडाली तारांबळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

शहरातील फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या राहुल नगर बिच्छू टेकडी परिसरात रविवारी रात्री एका डमी अश्रूधूर नळकांडीमुळे मोठी खळबळ उडाली. नळकांडीतून निघणाऱ्या धुरामुळे घरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास झाला. तर रस्त्याने जाणाऱ्यांच्या डोळ्यांत आग होऊ लागल्याने सर्वत्र धावपळ झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, परिसरातील एक अल्पवयीन मुलगा क्रिकेट खेळण्यासाठी एसआरपीएफच्या व्हॉलिबॉल मैदानावर गेला होता. तिथे त्याला एक डमी अश्रूधूर नळकांडी सापडली. कुतूहलापोटी त्याने ती नळकांडी घरी आणून फोडली. नळकांडी फुटताच त्यातून प्रचंड धूर बाहेर पडला, ज्यामुळे स्थानिक रहिवासी सैरावैरा पळू लागले.

घटनेची माहिती मिळताच एसीपी कैलास पुंडकर आणि फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार रोशन शिरसाट ताफा घेऊन घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी खबरदारी म्हणून एका अल्पवयीन मुलाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. मात्र चौकशीअंती त्याला सोडण्यात आले. रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी शेकडो नागरिकांची गर्दी जमली होती.

# मार्डी रोडवर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २३ अमरावती**

शहरातील मार्डी रोडवरील एका शाळेजवळ झालेल्या अपघातात ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली आणि चालक घटनास्थळावरून फरार झाला. राजेश यादव नागदिवे (५५) असे मृताचे नाव आहे. २० फेब्रुवारी रोजी रात्री ११:३० च्या सुमारास हा अपघात घडला होता. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात शनिवारी उशिरा रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजेश नागदिवे हे २० फेब्रुवारी रोजी रात्री ११:३० च्या सुमारास आपल्या दुचाकीने कामावरून परत येत होते. मार्डी रोडवरील अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल समोरून जात असताना, विरुद्ध दिशेने आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात राजेश नागदिवे यांच्या डोक्याला, पाठीला आणि पायाला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर नागदिवे यांना तातडीने इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान २१ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच त्यांचे आवई अक्षय राजेश राऊत (३१, रा. संजय गांधीनगर) यांनी पोलिसांत तक्रार नोंदवली.

# राष्ट्रपतींच्या शेगाव भेटीमुळे २४ व २५ फेब्रुवारीला दर्शन व्यवस्था तात्पुरती स्थगित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३शेगाव**


श्री गजानन महाराज संस्थान येथे मा. महामहीम राष्ट्रपती महोदया दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रींच्या दर्शनासाठी आगमन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या निर्देशानुसार राष्ट्रपतींना सर्वोच्च राजशिष्टाचार प्रदान करण्यात येणार असून सुरक्षा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने विशेष खबरदारीचे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.त्याअनुषंगाने मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासनाच्या वतीने रंगीत तालीम आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे त्या दिवशी सकाळी १०.३० ते १२.०० या वेळेत श्रींचे दर्शन तात्पुरते स्थगित राहील.तसेच बुधवार दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रपती महोदयांचे प्रत्यक्ष आगमन होणार असल्याने सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० या कालावधीत दर्शन व्यवस्था बंद राहणार आहे. त्यानंतर दर्शन व्यवस्था पूर्ववत सुरू करण्यात येईल, अशी माहिती संस्थानतर्फे देण्यात आली आहे.

# ११ उमेदवारांकडून खर्चाचा हिशेब प्रलंबित १५ दिवसांत उत्तर न दिल्यास अपात्रतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

महानगरपालिका निवडणुकीनंतर प्रशासकीय शिस्तीचा प्रश्न ऐरणीवर आला असून पराभूत झालेल्या ११ उमेदवारांनी अद्यापही निवडणूक खर्चाचा तपशील सादर केलेला नाही. मनपा निवडणुकीत एकूण ६६१ उमेदवार रिंगणात होते. नियमानुसार प्रत्येक उमेदवाराने निकालानंतर निश्चित मुदतीत खर्चाचा लेखाजोखा सादर करणे बंधनकारक आहे. यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती.लक्षवेधी बाब म्हणजे निवडून आलेल्या सर्व ८७ नगरसेवकांनी वेळेत हिशेब जमा केला आहे. मात्र ११ पराभूत उमेदवारांनी नियमांकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. मनपाचे लेखाधिकारी श्यामसुंदर देव यांनी संबंधितांना १५ दिवसांची नोटीस बजावण्यात येत असल्याची माहिती दिली. शासनाच्या १५ फेब्रुवारी २०२४ च्या निर्णयानुसार, मुदतीत हिशेब न दिल्यास पुढील निवडणुकीत उमेदवारीवर गदा येऊ शकते. त्यामुळे आता संबंधित उमेदवार काय भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

# आदिवासींच्या राखीव पदांवर ९ पोलिस उपनिरीक्षकांचा ताबा; 'जातवैधता' प्रमाणपत्रेच नाहीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

महाराष्ट्र पोलिस दलातील पोलिस उपनिरीक्षक तुकडी सत्र क्र.१२६ मधील ७ उमेदवारांनी आदिवासींच्या राखीव पदांवर घुसखोरी केल्याचे प्रकरण ताजे असताना आता पुन्हा पोलिस उपनिरीक्षक प्रशिक्षण तुकडी सत्र क्र. १२७ मध्ये ९ उमेदवारांनी आदिवासींच्या राखीव जागेवर घुसखोरी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'ट्रायबल फोरम'ने राज्याचे अपर मुख्य सचिव (सेवा) गृह विभागाचे अपर मुख्य सचिव, पोलिस महासंचालक मुंबई, अपर पोलिस महासंचालक नाशिक, आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्याकडे तक्रार केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पोलिस उपनिरीक्षक पदांसाठी निवड होऊन शिफारस करण्यात आली. शासनाने त्यांना नियुक्ती आदेश देऊन सध्या त्यांचे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलिस अकादमी नाशिक येथे सुरू आहे. पोलिस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती होऊन ८ महिने उलटून गेले तरीही या ९ उमेदवारांनी दावा केलेल्या जमातीची 'जातवैधता' प्रमाणपत्रे सादर केली नाहीत.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील कलम ८ नुसार जे उमेदवार अनुसूचित जमातीचे आहेत. त्यांना आपण अनुसूचित जमातीचे आहोत, हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांचीच आहे.

**असा आहे शासन निर्णय**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१२/प्र.क्र.१०६४/२०११/१६ – ब दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदीनुसार ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्ग आरक्षित पदावर झाली आहे. अशा उमेदवारांची नियुक्ती ६ महिन्याच्या आत 'जातवैधता' प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करतील, या अटींवर करण्यात येते.

नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांना सहा महिन्याच्या आत 'जातवैधता' प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. जातप्रमाणपत्र अवैध ठरल्यास तत्काळ सेवामुक्त करणे गरजेचे आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत